# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०२०

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**पुणे येथील जिल्हाधिकारी कार्यालयाच्या पुनर्वसन शाखेतर्फे वाटप करण्यात आलेल्या जमिनीमध्ये झालेला गैरव्यवहार**

**(१) २० (०३-०४-२०२०). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील जिल्हाधिकारी कार्यालयाच्या पुनर्वसन शाखेतर्फे वाटप करण्यात आलेल्या जमिनीमध्ये मोठ्या प्रमाणावर गैरव्यवहार झाल्याची बाब माहे जानेवारी २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुनर्वसन शाखेच्या जमीनवाटप गैरव्यवहाराबाबत विभागीय आयुक्तांकडे लेखी तक्रारी प्राप्त झाल्यानंतर चौकशी करण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी तीन जणांसह ८ मदतनीसांची चौकशी समिती स्थापन केली आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, समितीकडून सुरु असलेली चौकशी अद्यापर्यंत पूर्ण झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त जमीन वाटपात झालेला गैरव्यवहाराच्या चौकशीमध्ये होत असलेला विलंबाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी पुर्ण करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे काय,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विजय वडेट्टीवार (०८-०७-२०२०) :** (१) पुणे जिल्हाधिकारी कार्यालयातील पुनर्वसन शाखेमार्फत वाटप करण्यात आलेल्या पर्यायी जमिनीमध्ये गैरप्रकार झाला असल्याबाबतच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

विभागीय आयुक्त, पुणे यांनी चौकशी समिती स्थापन केली आहे. या समितीला मदत करण्यासाठी अतिरिक्त अधिकारी यांची नियुक्ती अपर जिल्हाधिकारी, पुणे यांनी केली आहे.

(३) व (४) विभागीय आयुक्त, पुणे यांच्या स्तरावर प्रकरणाची प्राथमिक तपासणी करुन अहवाल तयार करण्याची कार्यवाही चालू आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**हवेली (जि.पुणे) तालुक्यातील प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाबाबत**

**(२) ६५ (०२-०४-२०२०). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हवेली (जि.पुणे) तालुक्यातील प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनासह पुनर्वसित गावठाणांचे नागरी सुविधा प्रश्न अनेक वर्षांपासून प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी २०२०, मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनासह पुनर्वसित गावठाणांचे नागरी प्रश्न मार्गी लावण्यासाठी जिल्हास्तर कृती आराखडा तयार करून कार्यवाही करण्याच्या सूचना विभागीय आयुक्त, पुणे यांनी दिल्या असतांना देखील अद्यापपर्यंत कोणतीही कार्यवाही झाली नसल्याचे दिनांक १७ जानेवारी २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विजय वडेट्टीवार (१०-०७-२०२०) :** (१) व (२) अशंत: खरे आहे.
(३) पानशेत प्रकल्पांतील १२९८ खातेदारांना ४८५३ हेक्टर पर्यायी जमिनीचे आणि १२११ खातेदारांना भूखंड वाटप करण्यात आले आहे. विरबाजी पासलकर प्रकल्पातील २०५६ खातेदारांना २३८७ हेक्टर जमिन आणि २०५७ खातेदारांना भूखंड वाटप करण्यात आले आहेत. अंदाजित २०४ खातेदारांनी पर्यायी जमिन मिळण्याकरिता अर्ज सादर केले असून त्यांची पात्रता तपासून पर्यायी जमिन वाटपाबाबतची कार्यवाही जिल्हाधिकारी, पुणे यांचे स्तरावर चालू आहे. हवेली तालुक्यात सदर प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी नांदोशी, कोरेगांवमुळ आणि लोणीकाळभोर ही गावठाणे निर्माण केली आहेत. या गावाकरिता प्रत्येकी ९ प्रकारच्या २७ नागरी सुविधा देय आहेत. त्यापैकी २० नागरी सुविधा पुरविण्यात आल्या आहेत. उर्वरित ७ नागरी सुविधा पैकी ६ नागरी सुविधांची आवश्यकता विचारात घेऊन उचित कार्यवाही चालू आहे.

कोरेगांव मुळ या गावातील उघडी गटारे कामांचे चालू दरसुचीनुसार अद्यावत अंदाजपत्रक तयार करण्याची कार्यवाही उपसा सिंचन व्यवस्थापन विभाग, पुणे यांचेकडून चालू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सावित्रीबाई फुले विद्यार्थी उपस्थिती भत्ता योजनेत वाढ करण्याबाबत**

**(३) १४५ (०७-०४-२०२०). श्री.मनोहर चंद्रिकापूरे (अर्जुनी-मोरगांव), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.बाबासाहेब पाटील (अहमदपूर), ॲड.राहुल नार्वेकर (कुलाबा), श्री.प्रमोद (राजू) रतन पाटील (कल्याण ग्रामीण), श्री.अशोक पवार (शिरुर), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.निलेश लंके (पारनेर), श्री.सुनिल शेळके (मावळ), श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी), श्री.बाळासाहेब आजबे (आष्टी), श्री.संदिप क्षिरसागर (बीड), श्री.यशवंत माने (मोहोळ), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), ॲड.माणिकराव कोकाटे (सिन्नर), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.महेश बालदी (उरण), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर), श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.अतुल बेनके (जुन्नर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.श्रीनिवास वनगा (पालघर), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.राजू कारेमोरे (तुमसर), श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.विश्वनाथ भोईर (कल्याण पश्चिम), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.शेखर निकम (चिपळूण), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.बबनराव शिंदे (माढा), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), डॉ.किरण लहामटे (अकोले), श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्री.संग्राम जगताप (अहमदनगर शहर), श्री.महेंद्र थोरवे (कर्जत), श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) क्रांति ज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंती दिनी शासनाने २३ जानेवारी, १९९२ रोजी १ ली ते ४ थी मधील जिल्हा परिषद, नगरपालिका, नगरपरिषदांमार्फत चालविल्या जाणाऱ्या शाळेतील आदिवासी उपाययोजना क्षेत्राव्यतिरिक्त राज्याच्या अन्य भागातील अनुसूचित जाती-जमाती, भटक्या जमाती आणि विमुक्त जमातीतील गरीब विद्यार्थीनींना प्रतिदिन १ रुपया भत्त्ता योजना सुरु केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त योजना सुरु करुन जवळपास २७ वर्षाचा कालावधी उलटूनही गरीब विद्यार्थीनींचा उपस्थिती भत्ता प्रतिदिन अवघा एक रुपया असल्याचे माहे जानेवारी २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे हे,ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वाढती महागाई व शालेय साहित्य खर्चात वाढ होत असल्याने उपस्थिती भत्त्यामध्ये वाढ करण्याबाबत शासनाला प्राथमिक शिक्षण विभागाकडून पत्रव्यवहार करण्यात आलेला असतांना अद्याप निर्णय न घेण्याची कारणे काय आहेत वा सुरु असलेल्या कार्यवाहीची सद्यःस्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (२५-०८-२०२०) :** (१) व (२) होय,हे खरे आहे.

(३) उपस्थिती भत्ता या योजनेनंतर केंद्र/राज्य पुरस्कृत मध्यान्ह भोजन योजना, मोफत पाठयपुस्तके योजना व मोफत गणवेष योजना सुरू करण्यात आल्या.

तसेच मानव विकास मिशन मार्फत मुलींना मोफत सायकल वाटप योजना राबविण्यात येते. मुलींना १२ वी पर्यंत मोफत शिक्षण योजनाही राबविण्यात येत आहे.

त्यामुळे उपस्थिती भत्ता ही योजना आता कालबाहय झाली आहे. ही वस्तुस्थिती लक्षात घेता "उपस्थिती भत्ता योजने"चे रूपांतर "मुलींकरीता शौचालयाची देखभाल" या नवीन योजनेत करण्याचे शासनाच्या विचाराधिन आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नागपूर जिल्हयातील महाराजाबाग प्राणिसंग्रहालयाने वन विभागाकडे एका वाघाची मागणी केली असल्याबाबत

**(४) २२७ (०३-०४-२०२०). श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्रीय प्राणिसंग्रहालय प्राधिकरणाचा नियम आणि प्राण्यांच्या जैविक गरजा लक्षात घेता प्राणिसंग्रहालयात नर आणि मादी वन्यप्राणी योग्य संख्येत ठेवणे आवश्यक असुन त्याअनुषंगाने नागपूर येथील महाराजबाग प्राणिसंग्रहालयाने माहे डिसेंबर, २०१९ रोजी वा त्यादरम्यान जान या वाघिणीकरिता राज्याच्या वन विभागाकडे एक वाघाची मागणी केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यापूर्वी वनखात्याने अस्वलाच्या जोडीदाराची मागणी पूर्ण केली आहे मात्र महाराजबाग प्रशासनाने चंद्रपूरच्या ट्रान्झिन्ट ट्रिटमेंट केंद्रातील वाघाची मागणी केली असता ती अमान्य करण्यात आली आहे हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय तसेच वाघाची मागणी पुर्ण करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय राठोड (१४-०७-२०२०) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) आमटे ॲनिमल आर्क, हेमलकसा या बचाव केंद्रात पर्याप्त जागा नसल्याने ४ अस्वल पिल्ले (०२ मादी व ०२ नर) महाराजबाग प्राणी संग्रहालयातील बचाव केंद्रात स्थलांतरीत करण्याची परवानगी देण्यात आली आहे.

तसेच वाघासह इतर प्राणी महाराजबाग प्राणी संग्रहालयास उपलब्ध करुन देण्याकरीता राज्यातील इतर प्राणीसंग्रहालय व गोरेवाडा प्राणी संग्रहालय, नागपूर यांना कळविण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**माळढोक अभयारण्यातील (ता.कर्जत, जि.अहमदनगर) संरक्षित क्षेत्रात प्रतिबंधित असलेली खाण व ब्लास्टिंगची विना परवाना सुरु असलेली कामे**

**(५) ३५९ (०९-०४-२०२०). श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर व सोलापूर जिल्ह्यातील ३६६.७३ चौ. कि.मी. क्षेत्र महसूल व वन विभागाच्या दिनांक २७ सप्टेंबर, २०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये अधिसूचित झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केंद्र शासनाच्या दिनांक ९ फेब्रुवारी, २०११ रोजीच्या मार्गदर्शक सूचनांनुसार संरक्षित क्षेत्रापासून १० कि.मी. पेक्षा कमी अंतरावर खाणकाम करता येत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कर्जत तालुक्यातील माळढोक अभयारण्यातील संरक्षित क्षेत्रात प्रतिबंधित असलेली खाण व ब्लास्टिंगची कामे विना परवानगी सुरु आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने याप्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने संबधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) तसेच अभयारण्यातील संरक्षित क्षेत्रातील प्रतिबंधित असलेली खाण व ब्लास्टिंगची कामे रोखण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय राठोड (१४-०७-२०२०) :** (१) अधिसूचना क्रमांक :- डब्ल्यूएलपी-०६.१४/प्र.क्र.१११/फ-१ दिनांक ०५.०३.२०१६ अन्वये अहमदनगर व सोलापूर जिल्ह्यातील ३६६.७६ चौ.कि.मी. क्षेत्र हे माळढोक पक्षी अभयारण्य म्हणून अधिसूचित करण्यातआले असून दिनांक ०९.०३.२०१६ च्या महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिध्द करण्यात आले आहे.

(२) केंद्र शासनाच्या दिनांक १९.१२.२०१२ च्या आदेशान्वये संरक्षित क्षेत्रापासून १०.०० कि.मी. कमी अंतरावर खाणकाम करण्यास प्रतिबंध आहे. तथापि केंद्र शासनाने माळढोक पक्षी अभयारण्याच्या पर्यावरण संवेदनशील क्षेत्राची अंतिम अधिसूचना दिनांक ११.०२.२०२० रोजीच्या प्रसिध्द केली आहे. सदर अधिसूचन्वये अभयारण्याच्या सिमेपासून ०.०० कि. मी. ते ०.४०० कि.मी. पर्यत खाणकाम करण्यास बंदी आहे.

(३) हे खरे नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) वन्यजीव विभागातील संरक्षित क्षेत्रात क्षेत्रिय अधिकारी व कर्मचाऱ्यांमार्फत नियमित गस्त घालण्यात येते

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नवी मुंबई महापालिकेने औद्योगिक विकास महामंडळाकडे भूखंडाची केलेली मागणी**

**(६) ५०० (०२-०४-२०२०). श्री.गणेश नाईक (ऐरोली) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई विभागातील दिघा, ऐरोली, रबाळे, महापे, पावणे, तुर्भे व नेरूळ या भागातील नागरिकांना स्वच्छतागृह, समाजमंदिर, स्मशानभूमी, शाळा, अंगणवाड्या इत्यादी स्वरूपाच्या नागरी सुविधा पुरविण्यासाठी भूखंड हस्तांतरीत करून मिळण्याबाबत नवी मुंबई महापालिकेने औद्योगिक विकास महामंडळाकडे भूखंडाची मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त क्षेत्रातील नागरिकांना नागरी व मुलभूत सुविधा पुरवावयाच्या असल्याने व त्यापासून महापालिकेला कोणताही महसूल मिळणारा नसल्याने सदरचे भूखंड नाममात्र दराने मिळावेत म्हणून महापालिकेने मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी महापालिकेला भूखंड उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली तसेच अद्यापपर्यंत किती भूखंड नाममात्र दराने कायमस्वरुपी हस्तांतरीत केले आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (२६-०८-२०२०) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने महापालिकेला आतापर्यंत नाममात्र दराने ३१ भूखंड कायमस्वरुपी हस्तांतरीत केले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील साखर कारखाने व सूत गिरण्यांसाठीची कर्ज थकहमी योजना शासनाने पुन्हा सुरु केली असल्याबाबत**

**(७) ६३३ (०२-०४-२०२०). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.महेश बालदी (उरण), श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील साखर कारखाने व सूत गिरण्यांसाठीची कर्ज थकहमी योजना शासनाने पुन्हा सुरु केली असल्याचे माहे डिसेंबर २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आर्थिक अडचणीत असलेल्या दोन साखर कारखान्यांना ७२ कोटींच्या कर्जाला राज्य सहकारी बँकेकडून थकहमी देण्यात आली असल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, भविष्यात अशा किती साखर कारखान्यांना राज्य सहकारी बँकेकडून थकहमी देण्यात येणार आहे तसेच थकहमी योजनेमुळे राज्यावर एकूण किती रकमेचा वाढीव आर्थिक भार पडणार आहे,
(४) असल्यास, राज्यावर वाढीव आर्थिक भार पडू नये म्हणून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (११-०८-२०२०) :** (१) राज्य शासनामार्फत थकहमी देण्याची योजना बंद केलेली नसल्याने ती पुन्हा सुरु करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(२) दि. १९.१२.२०१९, दिनांक १३.५.२०२० व दिनांक २.७.२०२० च्या शासन निर्णय/ शुध्दीपत्रकानुसार दोन सहकारी साखर कारखान्यांना शासन थकहमी देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.
(३) महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेकडून थकहमी दिली जात नसून, बँकेने थकहमीची मागणी केल्यानंतर सदर कर्जास थकहमी देण्याबाबत शासनस्तरावर कार्यवाही करण्यात येते. भविष्यात अशाप्रकारे किती सहकारी साखर कारखान्यांना थकहमी देण्यात येईल हे निश्चित सांगता येणे शक्य नाही. तसेच सहकारी साखर कारखान्यांनी शासनाची थकहमी दिलेल्या कर्जाची परतफेड न केल्यास थकहमीचा भार शासनावर येत असतो.
(४) व (५) विभागाच्या दिनांक २.३.२०२० च्या शासन निर्णयान्वये सहकारी साखर कारखान्यांना राज्य शासनामार्फत हमी देण्याबाबत धोरण निश्चित करण्यात आले आहे.

---

## राज्यातील १ नोव्हेंबर, २००५ पुर्वी नियुक्त झालेल्या शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करण्याबाबत

**(८) ६६० (२३-०४-२०२०). श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.महेश बालदी (उरण), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील सर्व खाजगी अनुदानित, विनाअनुदानित अंशत: अनुदानित व तुकड्यांवर दिनांक १ नोव्हेंबर २००५ पुर्वी नियुक्त झालेल्या सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करण्याबाबत दिनांक २५ जुलै २०१९ च्या शासन निर्णयान्वये अभ्यास समिती नेमली त्यास ६ महिन्यापेक्षा जास्त कालावधी होऊन ही अद्याप या समितीचा अहवाल शासनास प्राप्त झाला नसल्याची बाब माहे जानेवारी २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अभ्यास समितीचा अहवाल शासनास वेळेत प्राप्त न झाल्यामुळे सेवानिवृत्ती नंतर वृद्धापकाळातील शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचा उदरनिर्वाह आधार हिरावून घेतला आहे हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, न्यायालयीन कर्मचाऱ्याप्रमाणे राज्यातील शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचारी आणि इतर सर्व शासकीय कर्मचाऱ्याना जुन्या पेन्शनचा लाभ शासन देणार आहे काय,
(४) असल्यास, त्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे काय,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (२०-०८-२०२०) :** (१) होय. संयुक्त समितीने दिनांक ३ जुलै, २०२० रोजी अहवाल सादर केलेला आहे.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) वित्त विभागाच्या धोरणानुसार कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बालभारतीच्या अभ्यास मंडळावरील काही सदस्यांच्या नियुक्त्या रद्द करण्याबाबत**

**(९) ७२३ (०९-०४-२०२०). श्री.वैभव नाईक (कुडाळ), डॉ.राहूल पाटील (परभणी), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.विश्वनाथ भोईर (कल्याण पश्चिम), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.महेंद्र थोरवे (कर्जत) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बालभारतीच्या सध्याच्या अभ्यास मंडळावरील कांही नियुक्त्या रद्द करुन नवीन अभ्यास मंडळे नेमण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने बाल भारतीच्या इतिहासाच्या पाठ्यपुस्तकात कथित बोफर्स घोटाळ्या चा उल्लेख व संरक्षण सामग्री आणि विशेषतः बोफर्स कंपनीकडून लांब पल्ल्याच्या तोफांच्या खरेदी संदर्भात झालेल्या भ्रष्टाचाराचे प्रकरण व आणीबाणीचा करण्यात आलेला उल्लेख वगळण्याचा निर्णय घेतला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने कार्यवाहीची सद्यःस्थिती काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (२५-०८-२०२०) :** (१) पाठ्यपुस्तक मंडळाच्या प्रचलित पध्दतीप्रमाणे तज्ज्ञांच्या वर्षभरातील कामकाजाचे अवलोकन करुन विषयनिहाय, इयत्तानिहाय समित्या व अभ्यासगटामधील २५ ते ३० टक्के सदस्यांची नावे कमी करण्यासाठीचा प्रस्ताव नियामक मंडळाच्या सभेपुढे सादर करणे प्रस्तावित आहे.

(२) व (३) इयत्ता नववीच्या इतिहास व राज्यशास्त्र विषयाच्या पुनर्रचित अभ्यासक्रमामध्ये सन १९६१ ते २००० या कालावधीतील महत्त्वाच्या घटना व घडामोडी यांचा समावेश करण्यात आला आहे. सदरचे पाठ्यपुस्तक प्रकाशित झाल्यानंतर विषयांकित प्रकरणी प्राप्त निवेदन व प्रसिध्द झालेल्या बातम्या विचारात घेवून बोफर्स प्रकरणात तत्कालिन मा. प्रधानमंत्री यांना सन २००४ मध्ये मा. न्यायालयाने निर्दोष ठरवल्याबाबतचा उल्लेख पाठ्यपुस्तकात नमूद केला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**परभणी जिल्ह्यात शासनाच्या विविध योजनांच्या लाभार्थ्यांची दलालांकडून होत असलेली फसवणूक**

**(१०) ९०९ (०३-०४-२०२०). श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) परभणी जिल्ह्यात विधवा, निराधारांच्या, अपंग निवृत्ती वेतन, श्रावणबाळ या सर्व योजनांच्या लाभार्थ्यांची दलालांकडून फसवणूक होत असल्याचे माहे डिसेंबर, २०१९ वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी दलाल लाभार्थ्यांना बँकेत बोलावून घेऊन पैसे काढण्यास मदत करतात व पैसे मिळताच निम्मे किंवा चौथा हिस्सा काढून घेतात, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने दलालांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे (१८-०८-२०२०) :** (१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मालेगाव (जि.धुळे) येथील शॉपिग कॉम्प्लेक्समध्ये विदेशी दारुची दुकाने सुरु असल्याबाबत**

**(११) ११४९ (०३-०४-२०२०). श्री.फारूक शाह (धुळे शहर) :** सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मालेगाव (जि.धुळे) येथील ८० फुटी रस्त्यावर असलेल्या शॉपिग कॉम्प्लेक्समध्ये पुनम तसेच सत्यम वाईन्स अशी दोन विदेशी दारुची दुकाने असून, सदर वाईन्स दुकाने नियमित सुरु असल्याने दुकानाच्या समोरच असलेल्या कनोसा कॉन्व्हेंट तसेच पीजी इंग्लिश शाळेत

देखील नर्सरी ते दहावी पर्यतच्या विद्यार्थ्यांना व त्यांच्या पालकांना गैरसोयीचा सामना करावा लागत असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर वाईन्स दुकानामध्ये खरेदीकरीता येणारी वाहने आडवी-तिडवी उभी असल्याने शाळकरी मुलांना व महिला वर्गास त्रासदायक होत असून वाहतूकीसही अडथळा निर्माण होत आहे हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या परिसरात नागरी वसाहती मोठया प्रमाणात असून अग्रसेन महाराजांच्या पुतळ्याची उभारणी करण्यात आली असून परिसराचेही नुतनीकरण करण्यात आले आहे. यास्तव शाळा/महाविद्यालय/धार्मिक पुतळे यांच्या परिसरात मद्याच्या दुकानांना परवानग्या देवू नयेत असा शासन निर्णय असतानाही या ठिकाणी मद्याच्या दुकानांना परवानग्या दिलेल्या आहेत हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शाळा / महाविद्यालय / धार्मिक पुतळे यांच्या परिसरात मद्याच्या दुकानांना परवानगी न देण्याबाबत तसेच सदर ठिकाणी नियमांची पायमल्ली करुन दुकानांना परवानगी देण्याऱ्या संबधितांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील (१४-०८-२०२०) :** (१), (२), (३) व (४) पुनम वाईन्स, एफ़एल-२ अनुज्ञप्ती व सत्यम वाईन्स ॲन्ड रेस्टॉरंट ही एफ़एल-३ अनुज्ञप्ती या मुंबई विदेशी मद्य नियम १९५३ मधील तरतुदीनुसार शैक्षणिक संस्था तसेच शासनाने विहीत केलेल्या राष्ट्रीय महापुरुषांच्या पुतळ्यापासून आंतरनिर्बंधमुक्त आहेत.
त्यानुसार सदर अनुज्ञप्त्यांना नियमातील तरतुदीनुसार परवानगी देण्यात आलेली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील शालेय पोषण आहार योजनेंतर्गत स्वयंपाकी व मदतनीसांचे मानधन देण्याबाबत**

**(१२) ११७९ (०८-०४-२०२०). श्री.फारूक शाह (धुळे शहर), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत स्वयंपाकी व मदतनिसांचे मानधन दरमहा तीन तारखेपर्यत वितरीत करण्याच्या सूचना शिक्षण संचालक कार्यालयाने शिक्षणाधिका-यांना दिल्या होत्या मात्र राज्यात गत सहा महिन्यांपासून या मदतनिसांना मानधन देण्यात आले नसल्याचे दिनांक १३ ऑक्टोबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत ग्रामीण भागातील शाळांमध्ये पोषण आहार शिजविणे व आहार वाटप करणा-या महिलांना यापूर्वी दरमहा एक हजार रुपये प्रतिमहिना

मानधन देण्यात येत होते वाढती महागाई लक्षात घेता माहे एप्रिल, २०१९ पासून दरमहा दीड हजार रुपये मानधन देण्याचा निर्णय सरकारने घेतला मात्र नवीन शैक्षणिक वर्ष सुरु झाल्यापासून या महिलांना अद्याप मानधन मिळाले नसल्याने या महिलांवर उपासमारीची वेळ आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने स्वयंपाकी व मदतनीस महिलांना त्यांचे मानधन लवकरात लवकर देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (२५-०८-२०२०) :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) स्वयंपाकी व मदतनीस मानधन अदा करण्याकरीता शिक्षणाधिकारी (प्राथ.), जिल्हा परिषद सर्व यांना प्राथमिक शिक्षण संचालनालय स्तरावरुन निर्देश देण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पुणे जिल्हयात अतिवृष्टी व पूरामुळे झालेल्या नुकसानाबाबत**

**(१३) १२९० (१८-०४-२०२०). श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्रीमती नमिता मुंदडा (केज), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी), श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.अशोक पवार (शिरुर) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हयातील एकूण क्षेत्राच्या ३७ टक्केहून अधिक क्षेत्रावरील पिकांचे पूर-अतिवृष्टीमुळे नुकसान झाले असून सुमारे अडीच लाख शेतकरी बाधित झाले असल्याचे दिनांक १२ नोव्हेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) तसेच पुणे शहरातील आंबील ओढ्याला दिनांक २५ डिसेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास अतिवृष्टीमुळे आलेल्या पुरामध्ये मोठ्या प्रमाणात जीवित व वित्तहानी झाल्याची बाब निदर्शनास आली हे खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्याचे मा. मुख्यमंत्री यांनी या नुकसानीसंदर्भात आर्थिक मदत देण्यासाठी पुणे विभागाला ३८९ कोटी रुपयांचा निधी जिल्हाधिकाऱ्यांकडे वर्ग केला आहे हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, निधी प्राप्त होऊनही अद्यापपर्यत नुकसान भरपाई देण्यात आलेली नाही हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्या अनुषंगाने नुकसानीचे पंचनामे करुन बाधित शेतकऱ्यांना तसेच नुकसानग्रस्तांना नुकसानभरपाई तात्काळ देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विजय वडेट्टीवार (१०-०८-२०२०) :** (१) होय.

पुणे जिल्हयात माहे ऑक्टोबर-नोव्हेंबर, २०१९ मध्ये झालेल्या अतिवृष्टी, गारपिटमुळे शेतीपिके, फळपिके नुकसान झालेले आहे. पुणे जिल्हयात एकूण १३ तालुक्यांतील १७८२ गावांमधील २,६५,३९८ लाभार्थींचे १,२६,३४४.०४ हेक्टर क्षेत्रावर भात, सोयाबीन, भाजीपाला, फळपिके, कांदा व इतर पिके यांचे नुकसान झालेले आहे.

(२) दि.२५ डिसेंबर, २०१९ रोजी पुणे जिल्हयात पाऊस झालेला नसल्यामुळे प्रश्न उद्भवत नाही.

(३) पुणे जिल्हयात माहे ऑक्टोबर-नोव्हेंबर, २०१९ मध्ये झालेल्या अतिवृष्टी, गारपिटमुळे शेतीपिकांचे, फळपिकांचे नुकसान झाले आहे. त्याची नुकसान भरपाई म्हणून २,६५,३९८ बाधित शेतकऱ्यांना रू.१०९९३.९१ लक्ष इतके अनुदान वितरीत करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

### सन २०२१ च्या जनगणनेपूर्वी शौचालय नसलेल्या कुटुंबाचे सर्वेक्षण करुन शौचालय बांधण्याबाबत

**(१४) १५४० (०६-०४-२०२०). श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सन २०२१ च्या जनगणनेपूर्वी शौचालय नसलेल्या सर्व कुटुंबाचे सर्वेक्षण करुन शौचालय बांधण्याची मोहिम राबविण्याच्या सूचना माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान केंद्रीय जलशक्ती मंत्रालयाने दिल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त केंद्रीय जलशक्ती मंत्रालयाने दिलेल्या सूचनांसंदर्भात राज्यात शासनाकडून कोणती मोहिम राबविण्यात आली वा येत आहे, याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (२८-०८-२०२०) :** (१) हे खरे आहे.

दिनांक १३/१२/२०१९ रोजी सचिव, जलशक्ती मंत्रालय, भारत सरकार व मुख्य सचिव यांच्या राज्यातील सर्व जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या समवेत झालेल्या व्हिडीओ कॉन्फरन्स मध्ये अशा सूचना देण्यात आल्या.

(२) प्रधान सचिव स्तरावरुन दिनांक ४ फेब्रुवारी, २०२० च्या अर्धशासकीय पत्रान्वये मुख्य कार्यकारी अधिकारी, सर्व जिल्हा परिषद यांना प्रलंबित वैयक्तिक शौचालय बांधकाम उद्दिष्ट पूर्ण करण्याबाबत निर्देश देण्यात आले. तसेच राज्यस्तरावरुन वारंवार पत्राव्दारे व व्हिडीओ कॉन्फरन्सव्दारे प्रलंबित वैयक्तिक शौचालय बांधकाम पूर्ण करण्याबाबत पाठपुरावा करण्यात येत आहे.

सद्य:स्थितीत स्वच्छ भारत अभियान (ग्रामीण) अंतर्गत पायाभूत सर्वेक्षण, २०१२ नुसार त्यावेळी शौचालय नसलेल्या ५९६४१३७ कुटुंबांनी आत्ता वैयक्तिक शौचालय बांधकाम केलेले आहे. पायाभूत सर्वेक्षणातून सुटलेल्या कुटुंबांचे वैयक्तिक शौचालय बांधकामाचे १०७१०२३ इतके उद्दिष्ट होते. त्यापैकी ९६०९८८ इतक्या वैयक्तिक शौचालयाचे बांधकाम करण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**दहीगांव गावंडे (जि.अकोला) येथे वन्य प्राण्यांमुळे शेतीचे झालेले नुकसान**

**(१५) १६१७ (१५-०४-२०२०). श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दहीगांव गावंडे (जि.अकोला) येथील शेती शिवारातील शेतक-यांचे संपूर्ण हरभरा पिक हरणांच्या कळपाने उध्वस्त केल्याचे दिनांक ५ जानेवारी, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास, भविष्यात हरणांमुळे होणाऱ्या शेतीच्या नुकसानीस प्रतिबंध करण्यासाठी शासनामार्फत कोणत्या उपाययोजना करण्यात आल्या वा येत आहेत,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय राठोड (१४-०७-२०२०) :** (१) व (२) श्री.गजानन दयाराम वसु, रा. अन्वी मिर्झापूर यांचे मौजे दहिगाव गावंडे येथील शेतातील दिनांक १२.०२.२०१९ रोजी हरणांच्या कळपाने हरभरा पिकाचे नुकसान केल्याची घटना निदर्शनास आली आहे.

प्रचलित शासन निर्णयातील तरतूदीनुसार नुकसानग्रस्त शेतकऱ्यास रु. ८,३५९/- इतकी नुकसान भरपाई अदा करण्यात आली आहे.
(३) डॉ.श्यामा प्रसाद मुखर्जी जन-वन विकास योजनांतर्गत प्रायोगिक तत्वावर वनालगतच्या संवेदनशिल गावांच्या वनसिमेवर लोखंडी जाळीचे कुंपन उभारण्यास मान्यता प्रदान करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे जिल्हयातील शिवाजीराव भोसले सहकारी बँकेत झालेल्या गैरव्यवहाराबाबत**

**(१६) १६४४ (०३-०४-२०२०). श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे जिल्हयातील शिवाजीराव भोसले सहकारी बँकेच्या रोख रक्कमेत सुमारे ७१ कोटी ८७ हजार ७२३ रुपयांचा गैरव्यवहार झाला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, सदर चौकशीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (२३-०७-२०२०) :** (१) होय.
(२) व (३) शिवाजीराव भोसले सहकारी बँकेच्या सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाच्या वैधानिक लेखापरिक्षण अहवालामध्ये रु.७२.०५ कोटी इतक्या रोख रकमेचा गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आले आहे. सदर अहवालाच्या अनुषंगाने संबंधित लेखापरिक्षकांनी बँकेतील झालेल्या अपहारास जबाबदार असणाऱ्या संबंधित व्यक्तींविरुध्द शिवाजीनगर पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. २६/२०२०, दिनांक १८.०१.२०२० अन्वये गुन्हा नोंदविला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अंगावर वीज पडून मृत्युमुखी झालेल्या शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना**
**आर्थिक भरपाई देण्याबाबत**

**(१७) १९०५ (१०-०४-२०२०). श्री.निलेश लंके (पारनेर), श्री.अशोक पवार (शिरुर), श्री.सुनिल शेळके (मावळ), श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी), श्री.बाळासाहेब आजबे (आष्टी), श्री.संदिप क्षिरसागर (बीड), श्री.यशवंत माने (मोहोळ), श्री.राजेश एकडे (मलकापूर), ॲड.माणिकराव कोकाटे (सिन्नर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्रीमती सुमन पाटील (तासगाव-कवठेमहांकाळ) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात शेतावर काम करीत असणाऱ्या शेतकरी व शेतमजूरांवर वीज पडून मृत्यु पावल्याच्या दुर्घटना माहे सप्टेंबर व ऑक्टोबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान घडल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जळगाव जिल्हयातील मौजे भवरखेड (ता.धरणगाव) येथे शेतकऱ्यांसह शेतमजूर मिळून ५ जणाचा झालेला मृत्यु, नांदुरा तालुक्यात अलमपूर (जि.बुलढाणा) १ महिलेचा, हिंगोली जिल्हयातील बसमत तालुक्यातील मौ.रासतळ (ता.जाफराबाद, जि.जालना) येथे ३ जणांचा तर अकोला जिल्हयातील अकोट तालुक्यातील लाडेगाव शिवारात एक शेतकऱ्याचा, तेल्हारा तालुक्यातील वरुड-भोकर शिवारात ३ जणांचा, अमरावतील जिल्हयातील पुर्णानगर येथे ३ जणांचा तसेच नांदेड जिल्हयातील माळबोरगाव, (ता.किनवट) माहूर तालुक्यातील सारखणी व हिमायतनगर तालुक्यातील मौ.सिरपल्ली आदि ठिकाणी सुमारे २१ शेतकऱ्यांच्या अंगावर वीज पडून मृत्यु झाल्याचे निदर्शनास आले आहे, हेही खरे आहे काय,
(३) तसेच बुलढाणा जिल्हयात झालेल्या अतिवृष्टीमुळे पाच जणांचा मृत्यु झाल्याची बाब दिनांक २८ ऑक्टोबर, २०१९ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी मृत्युमुखी पडलेल्यांच्या वारसांना शासनाकडून अद्यापही नुकसान भरपाई देण्यात आली नाही हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, मृत्यूमुखी पडलेल्याच्या वारसांना आर्थिक नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विजय वडेट्टीवार (१०-०८-२०२०) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) माहे सप्टेंबर व ऑक्टोबर, २०१९ मध्ये जळगाव जिल्हयातील मौजे भवरखेड (ता.धरणगांव) येथील ५ शेतकऱ्यांचा, अलमपूर (ता.नांदुरा, जि.बुलढाणा) येथील १ महिलेचा, अकोला जिल्हयातहील अकोट तालुक्यातील १ शेतकऱ्याचा व तेल्हारा तालुक्यातील ३ शेतकऱ्यांचा, अमरावती जिल्हयातील पूर्णानगर येथे ३ जणांचा नांदेड जिल्हयातील किनवट तालुक्यातील माळबोरगाव येथे एकाचा, माहूर तालुक्यातील साखरणी येथे एकाचा, हिमातयनगर तालुक्यातील मौजे सिरपल्ली येथे एकाचा असे एकूण १६ जणांचा वीज पडून मृत्यू झाल्याचे निदर्शनास आले आहे.

तथापि, हिंगाली तालुक्यात बसमत तालुक्यात व मौजे रासतळ(ता.जाफराबाद, जि.जालना) येथे माहे सप्टेंबर व ऑक्टोबर, २०१९ मध्ये वीज पडून मृत्यू झाल्याचे निदर्शनास आलेले नाही.

(३), (४) व (५) सदर प्रकरणी शासन निर्णय दि.१३.०५.२०१५ मधील तरतूदीनुसार उक्त १६ मृत व्यक्तींच्या वारसांना प्रत्येकी ४ लक्ष प्रमाणे मदत वाटप करण्यात आली आहे.

---

## मळीच्या निर्यात बंदीमुळे ऊस उत्पादक तोट्यात आल्याबाबत

**(१८) २४७१ (०३-०४-२०२०). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ऊसातून निर्माण केलेली मळी या वर्षी परराज्यात व परदेशात निर्यात करण्यास शासनाने बंदी घातल्याने ऊस उत्पादन तोट्यात आल्याची बाब माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने मळीवरील निर्बंध उठविण्याबाबत शासन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील (२९-०७-२०२०) :** (१), (२) व (३) सन २०१९-२० या मळी हंगामामध्ये मळीचे उत्पादन दरवर्षी उत्पादित होणाऱ्या मळीच्या तुलनेत कमी प्रमाणात होणार असल्याने इथेनॉल निर्मिती व देशी / विदेशी मद्य निर्मितीकरीता आवश्यक असलेल्या मद्यार्काचे उत्पादन देखील कमी होऊन मद्यार्काचा तुटवडा भासणार होता. त्यामुळे, गृह विभाग, शासन निर्णय, दि.२७.१२.२०१९ अन्वये, सन २०१९- २० या मळी हंगामातील उत्पादित मळीच्या परराज्यात / परदेशात निर्यातीवर दि.३०.०९.२०२० पर्यंत बंदी घालण्यात आली होती. सदर निर्यातीवरील बंदी ही गृह विभाग, शासन निर्णय दि.२९ जून, २०२० अन्वये उठविण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**वन अधिकारी (वन्यजीव) यांचे मुख्यालय बुलढाणा येथे स्थलांतरीत करण्याबाबत**

**(१९) २५५२ (१६-०४-२०२०). ॲड.आकाश फुंडकर (खामगांव) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्ह्यातील ज्ञानगंगा अभयारण्याचे क्षेत्रफळ २०३५४.६० हेक्टर असून ह्या अभयारण्यात अस्वल, बिबटया इत्यादी हिंस्त्र पशु असुन या हिंस्त्र पशुंच्या हल्ल्यात अनेक व्यक्ती जखमी तसेच मृत पावल्या असुन हे प्राणी नागरी वस्तीत येत असल्याच्या घटनांमध्ये वाढ झाली असल्याचे निदर्शनास आले आहे,हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वन अधिका-यांचे मुख्यालय अकोला येथे असल्याने बुलढाणा येथे घटनास्थळी पोहचण्यास वन विभागाच्या अधिकारी अथवा कर्मचा-यांना वेळ लागत असल्यामुळे अनेक समस्या निर्माण होतात, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अकोला जिल्ह्यातील काटेपुर्णा अभयारण्यात क्षेत्रफळ हे केवळ ३८७६.४५ हेक्टर असून देखील वन अधिकारी (वन्यजीव) यांचे मुख्यालय अकोला येथे आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, बुलढाणा जिल्ह्यातील ज्ञानगंगा अभयारण्याचे क्षेत्रफळ हे अकोला जिल्ह्यातील काटेपुर्णा अभयारण्यापेक्षा जास्त असल्यामुळे वन अधिकारी (वन्यजीव) याचे मुख्यालय बुलढाणा येथे स्थलांतरीत करण्याबाबत तसेच मानवी वस्तीवर वन्य प्राण्यांकडून होणारे हल्ले रोखण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय राठोड (१४-०७-२०२०) :** (१) ज्ञानगंगा अभयारण्यात मागील ४-५ वर्षेपासून व्यक्ती जखमी किंवा मृत पावल्याची घटना झाल्याचे निदर्शनास आलेली नाही.

(२) हे खरे नाही.

ज्ञानगंगा अभयारण्य क्षेत्राच्या व्यवस्थापनासाठी तीन वनपरिक्षेत्र अधिकारी (वन्यजीव) असून त्यापैकी एका वनपरिक्षेत्र अधिकारी (वन्यजीव) यांचे मुख्यालय, बुलढाणा येथे आहे.

(३) व (४) विभागीय वन अधिकारी, वन्यजीव विभाग, अकोला यांच्या अधिनस्त काटेपुर्णा, कारंजा सोहळ व लोणार ही ३ अभयारण्य आहेत.

अकोला यांचे मुख्यालय अकोला असून अकोला ते काटेपुर्णा अंतर ३५ कि.मी. व अकोला ते कारंजा सोहळ १०० कि.मी. आहे. बुलढाणा मुख्यालय झाल्यास मुख्यालयापासुन काटेपुर्णा अभयारण्य १३५ कि.मी. होईल व कारंजा सोहळ २०० कि.मी.होईल.

मानव व वन्यप्राणी यांचा संघर्ष टाळण्याच्या दृष्टीने खालीप्रमाणे उपाययोजना करण्यात येत आहेत :-

• मानव व वन्यप्राणी संघर्ष टाळण्यासाठी उपाययोजना बाबतचे भिंती पत्रके (Poster) गावोगावी लावण्यात आले आहेत.

• वनक्षेत्रात तसेच वनक्षेत्राच्या जवळच्या भागामध्ये दिवस-रात्र गस्त घालण्यात येते.

• मानव व वन्यप्राणी यांचा संघर्ष कमी करण्याच्या दृष्टीने जनजागृती करण्यात येते.

• वन्यप्राण्यांना वनक्षेत्रात पिण्याचे पाणी उपलब्ध व्हावे याकरीता कृत्रिम पाणवठ्यांची निर्मिती करण्यात येते.

• वन्यप्राण्यांच्या हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या इसमाच्या वारसास तसेच पशुहानी झालेल्या लाभार्थ्यास प्रचलित शासन निर्णयातील तरतूदीनुसार नुकसान भरपाई अदा करण्यात येते.

• मानवाचे वनावर अवलंबन कमी करण्याच्या दृष्टीने वनालगत असलेल्या गावामधील ग्रामस्थांना एल.पी.जी. गॅस वाटप करण्यात येते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महागांव तालुक्यातील (जि.यवतमाळ) कोठारी येथील**
**शेतमजूरांवर तीन अस्वलांनी केलेला हल्ला**

**(२०) २६६९ (०७-०४-२०२०). श्री.नामदेव ससाने (उमरखेड) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महागांव तालुक्यातील (जि.यवतमाळ) कोठारी येथील शेतमजूरांवर तीन अस्वलांनी दिनांक १४ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास हल्ला केल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हल्ल्यातील गंभीर शेतमजूरांना कोणती तातडीची वैद्यकिय मदत केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, या भागात अस्वलांचा मुक्त संचार असल्याने नागरिकांवर होणारे जीवघेणे हल्ले रोखण्याकरिता शासनाने काय उपाययोजना केल्या आहेत वा करण्यात येत आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय राठोड (१४-०७-२०२०) :** (१) व (२) पुसद वनविभागातील मौजा कोठारी येथे श्री.विश्वासराव देवराव मार्कडे, रा.कोठारी यांचे शेतात काम करीत असलेला मजूर श्री.आत्माराम संभाजी ठाकरे रा.राजुरा यांना दिनांक १४.०१.२०२० रोजी अस्वलांनी हल्ला करुन गंभीर जखमी केल्याची घटना निदर्शनास आली आहे.

सदर व्यक्तीवर डॉ. शकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नांदेड येथे उपचार करण्यात आले असून प्रचलित शासन निर्णयातील तरतुदीनुसार जखमी व्यक्तीस उपचाराकरीता आर्थिक मदत रु. १,२५,०००/- अदा करण्यात आले आहेत.

(३) पूसद वन विभागामार्फत मानव वन्यप्राणी संघर्ष टाळण्याच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे उपययोजना करण्यात येतात.

• स्थानिक गावकऱ्यांमध्ये जन जागृतीद्वारे सतर्क करण्यात येते.

• वनकर्मचारी / अधिकारी यांचेमर्फत पेट्रोलिंग वाहनाद्वारे गस्त करण्यात येते.

• वन्यप्राण्यांना पिण्याचे पाणी वनक्षेत्रात उपलब्ध व्हावे म्हणून नैसर्गिक पानवठ्यांसह कृत्रिम पाणवठे तयार करण्यात येतात.

• वनक्षेत्र व वन्यप्राणी प्रवण क्षेत्रात वन कर्मचाऱ्यामार्फत सातत्याने गस्त करुन वन्यप्राण्यांच्या हालचालीवर लक्ष ठेवण्यात येते.

• वनक्षेत्रा लगतच्या गावांमध्ये मानव-वन्यप्राणी संघर्ष रोखण्याच्या अनुषंगाने भिती पत्रके, इशारा दर्शक फलक लावण्यात येतात.

• वन्यप्राण्यांच्या हल्ल्यात मृत/ जखमी व्यक्ती किंवा त्याच्या कायदेशीर वारसास तसेच पशुधनाच्या मालकांना तात्काळ आर्थिक मदत देण्यात येते.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**चिचाळा, ताडाळा (ता.मुल, जि.चंद्रपुर) या परिसरात वाघाची दहशत असल्याबाबत**

**(२१) २८२० (०५-०४-२०२०). श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिचाळा, ताडाळा (ता.मुल, जि.चंद्रपुर) या परिसरात वाघाची दहशत असल्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्प चंद्रपूर यांना दिनांक १३ डिसेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन दिले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय राठोड (१४-०७-२०२०) :** (१) हे खरे नाही.

चिचाळा, ताडाळा (ता.मुल. जि.चंद्रपूर) हे क्षेत्र मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), चंद्रपूर यांचे अधिकार क्षेत्रात येते.

(२) व (३) माहे डिसेंबर, २०१८ चे सुमारास चंद्रपूर वन विभागातील चिचपल्ली वनपरिक्षेत्राअंतर्गत क्षेत्रीय कर्मचाऱ्यांना गस्तीदरम्यान रंगारी तलावाजवळ वाघीण चार बछड्यांसह वावरत असल्याचे निदर्शनास आले आहे. सदर क्षेत्र प्रतिबंधीत करुन वन कर्मचाऱ्यांची गस्त वाढवीण्यात आली.

माहे जून २०१९ चे दरम्यान सदर वाघिणीने तिच्या चार पिल्लांसह पांढरा चुहा खोदतळे जवळ वास्तव्य केल्याचे निदर्शनास आलेले होते.

कवपेठ व चिचाळा या गावामध्ये माहे एप्रिल, २०१९ ते ऑक्टोबर, २०१९ या कालवधील सदर वाघिणिच्या हल्ल्यात २ व्यक्तीचा व १५ पाळीव प्राण्यांचा मृत्यु झाल्याच्या घटना निदर्शनास आल्यास आहेत.

सदर परिसरात मानव-वन्यजीव संघर्षाची स्थिती उद्भवू नये याद्दष्टीने आवश्यक उपाययोजना करण्यात आल्या आहेत.

सदर घटनेचे गांभीर्य लक्षात घेवून उपरोक्त वाघिण व तिच्या चार बछड्यांना जेरबंद करुन Translocate करण्याच्या अनुषंगाने Tiger Conservation Translocation करीता राज्य स्तरीय समितीची स्थापना करण्यात आली. सदर समितीने केलेल्या शिफरशीनुसार सदर वाघिण व चार बछड्यांना जेरबंद करुन गडचिरोली येथे निसर्गमुक्त करण्याच्या अनुषंगाने पूढील आवश्यक कार्यवाही सूरु आहे.

---

**यवतमाळ जिल्ह्यातील तहसिल कार्यालयातील संजय गांधी निराधार व श्रावणबाळ योजनेतील प्रलंबित प्रकरणांबाबत**

**(२२) २८५० (०३-०४-२०२०). श्री.मदन येरावार (यवतमाळ) :** सन्माननीय **विशेष सहाय्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्ह्यातील तहसिल कार्यालय येथे संजय गांधी निराधार व श्रावणबाळ योजनेतील प्रकरणे प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणाबाबत श्री.मामा काटे यांनी श्री.म्हस्के, तहसिलदार यांना प्रकरण मंजूर करण्याबाबत विचारणा केली असता त्यांना अरेरावीची भाषा वापरुन कार्यालयातून बाहेर काढले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी ग्रामीण भागातील लार्भार्थ्यांनी सदर नायब तहसिलदारांविरुध्द जिल्हाधिकारी यांचेकडे दिनांक १८ डिसेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास तक्रार केली आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे (१०-०८-२०२०) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) हे खरे नाही

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**खानापूर, आटपाडी तालुक्यात (जि.सांगली) अवकाळी पावसामुळे रब्बी व फळ पिकांचे झालेले नुकसान**

**(२३) २८८८ (०७-०४-२०२०). श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आटपाडी तालुक्यात (जि.सांगली ) अवकाळी पावसामुळे रब्बी आणि फळ पिकासह विविध पिकांचे तीनशे कोटी रुपयांच्यावर नुकसान झाले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर नुकसानीबाबत प्रशासनाने पंचनामे केले असून १० कोटी रुपयांची नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाकडे मागणी केली आहे हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त नुकसानग्रस्त शेतक-यांना नुकसान भरपाई देण्याबाबत शासन स्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विजय वडेट्टीवार (१०-०८-२०२०) :** (१), (२) व (३) अशंत: खरे आहे.
सांगली जिल्हयाकरिता एकूण २१९६६.७० लक्ष इतका निधी उपलब्ध करून देण्यात आला असून, आटपाडी तालुक्याकरिता अवकाळी पावसामुळे रब्बी व फळपिकांसह बाधित क्षेत्राकरिता मदत म्हणून रू.९३०.२३ लक्ष इतका निधी वाटप करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नांदेड जिल्हयात परतीच्या पावसाने खरीप हंगामातील तीन लाख ९२ हजार हेक्टरवरील पिकांचे झालेले नुकसान**

**(२४) ३००३ (१०-०४-२०२०). श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदेड जिल्हयात परतीच्या पावसाने खरीप हंगामातील तीन लाख ९२ हजार हेक्टरवरील सोयाबीन, ज्वारी व कपाशी पिकाचे नुकसान झाल्याचा राज्याच्या कृषि विभागाचा प्राथमिक अंदाज असल्याचे माहे डिसेंबर, २०१९ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नांदेड जिल्हयातील भोकर विभागात शेतीचे प्रचंड प्रमाणात परतीच्या पावसाने नुकसान झाल्याने संपूर्ण जिल्हयात तीन लाख ९२ हजार हेक्टर वरील शेतीचे नुकसान झाले असुन शासकीय यंत्रणेसह विमा कंपनीकडूनही सर्व्हे करुन नुकसानग्रस्त शेतक-यांना मदत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विजय वडेट्टीवार (१०-०८-२०२०) :** (१) होय, हे खरे आहे,
(२) शेतीपिकांच्या नुकसानीकरिता नांदेड जिल्हयासाठी एकूण रू.५०९०४.२१ लक्ष एवढा निधी उपलब्ध करून देण्यात आला असून, त्यापैकी नांदेड जिल्हयातील भोकर विभागात शेतीच्या झालेल्या नुकसानीकरिता बाधित शेतकऱ्यांना रू.२८१०.७५ लक्ष एवढया निधीचे वाटप करण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पुणे शहर व जिल्हयामध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे बाधित व्यक्तींच्या नातेवाईकांना मदत देण्याबाबत**

**(२५) ३३७० (१४-०४-२०२०). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे शहर व जिल्हयामध्ये झालेल्या अतिवृष्टीत १६ व्यक्तींचा तसेच शेकडो जनावरांचा मृत्यू झाला असून, ९ नागरीक बेपत्ता झाले असल्याची घटना दिनांक २५ सप्टेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या पावसामुळे प्रामुख्याने दक्षिण पुणे आणि सिंहगड रस्ता परिसरात बहुतांश सोसायट्यांमध्ये पाणी शिरल्याने सिमा भिंती कोसळून नाल्यातून आलेल्या पाण्याच्या लोंढ्याने, मोटारीसह हजारो दुचाकी वाहून गेली आहेत हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार भविष्यात अशी परिस्थिती उद्भवू नये म्हणून कोणती उपाययोजना केली आहे तसेच नुकसानग्रस्तांना व मृतांच्या नातेवाईकांना मदत करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विजय वडेट्टीवार (१०-०८-२०२०) :** (१) होय, हे खरे आहे,

पुणे शहर व जिल्हयामध्ये दि.२५.०९.२०१९ रोजी झालेल्या अतिवृष्टीमुळे एकूण ३० व्यक्तींचा मृत्यू झाला व ४ नागरीक बेपत्ता झाले आहेत.

तसेच सदर कालावधीत अतिवृष्टीमुळे लहान-मोठी २०४ जनावरे मृत झाली असून पशु कोंबडया ६२८ मयत झाल्या आहेत.

(२) होय, हे खरे आहे.
(३) व (४) पुणे शहर व जिल्हयामध्ये दि.२५.०९.२०१९ रोजी झालेल्या अतिवृष्टीमुळे पुणे जिल्हयात एकूण ३० मयत व्यक्तींपैकी २७ मयत व्यक्तींच्या नातेवाईकांना रू.१०८,००,०००/- लक्ष इतकी मदत वाटप करण्यात आली असून उर्वरीत ३ मयत व्यक्तींचे वारस मिळून न आल्याने मदत देता आलेली नाही. त्याचप्रमाणे लहान व मोठी जनावरांच्या मालकांना रू.२४,५४,०००/- व मयत कोंबडयांच्या मालकांना रू.१३,२५०/- मदत वाटप करण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### गट ग्रामपंचायत गेवर्धा (ता.कुरखेडा, जि.गडचिरोली) येथील पाणी पुरवठा कर्मचाऱ्याचा विजेचा धक्का लागुन झालेला मृत्यु

**(२६) ३५४१ (०३-०४-२०२०). श्री.कृष्णा गजबे (आरमोरी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गट ग्रामपंचायत गेवर्धा (ता.कुरखेडा, जि.गडचिरोली) येथील पाणी पुरवठा कर्मचारी रहीम गुलमीर खॉ पठान ग्रामपंचायत अंतर्गत येणाऱ्या कुरुंडी येथील डी.पी.वर चढुन दुरुस्ती करीत असतांना विजेचा धक्का लागुन मृत्युमुखी पडल्याची गंभीर घटना दिनांक ४ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने मृत्युमुखी पडलेल्या ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या कुटुंबीयांना नुकसान भरपाई देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. नितिन राऊत (१९-०८-२०२०) :** (१) गट ग्रामपंचायत गेवर्धा (ता.कुरखेडा, जि.गडचिरोली) येथील पाणी पुरवठा कर्मचारी श्री. रहीम गुलमीर खान पठान (बाह्यव्यक्ती) कुरंडी गावाजवळील शेतीपंपांना वीज पुरवठा करणाऱ्या डीपीवर अनधिकृतरित्या चढल्याने वीज वाहिन्याशी संपर्क झाल्याने विजेचा धक्का लागून दि.०४.०१.२०२० रोजी अपघात झाला व दिनांक ०७.०१.२०२० रोजी नागपूर येथील रुग्णालयात त्यांचा मृत्यू झाला.
(२) श्री. रहीम गुलमीर खान पठान यांना झालेल्या विद्युत अपघाताबाबत विद्युत निरीक्षक, गडचिरोली यांच्यामार्फत चौकशी केली असून त्यांनी दिनांक २०.०२.२०२० रोजीच्या पत्रान्वये कळविल्यानुसार वारसदारास तातडीची मदत रु.२०,०००/- दिनांक २४.०२.२०२० रोजी अदा करण्यात आली. तसेच महावितरणच्या नियमाप्रमाणे नुकसान भरपाई रक्कम रु.३,८०,०००/- दिनांक २८.०२.२०२० नुसार अदा करण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ग्रामीण भागातील अवैध मदयनिर्मिती व मदयविक्रीला आळा घालण्यासाठी स्थानिक पातळीवर ग्रामरक्षक दलाची स्थापना करण्याबाबत**

**(२७) ३६३७ (०३-०४-२०२०). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.रावसाहेब अंतापूरकर (देगलूर) :** सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्याच्या ग्रामीण भागात अवैध मदयनिर्मिती व मदयविक्री सुरु आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ग्रामीण भागातील अवैध मदयनिर्मिती व मदयविक्रीला आळा घालण्यासाठी लोकसहभागातून स्थानिक पातळीवर ग्रामरक्षक दलाची स्थापना करण्याची सुचना जिल्हाधिकाऱ्यांना शासनाने दिल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील (२७-०७-२०२०) :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) हे खरे आहे. अवैध मद्यनिर्मिती / विक्री इत्यादींवर जनसहभागातून नियंत्रण मिळविण्यासाठी "महाराष्ट्र ग्रामरक्षक दल नियम २०१७" तयार करण्यात आले आहेत. त्यानुसार ग्रामरक्षक दल स्थापनेकरीता आवश्यक कार्यवाही करण्याकरीता आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, मुंबई यांचेकडून यापूर्वी सर्व अधीक्षकांना दि.६.३.२०१८, दि.२८.११.२०१८ व दि.१५.१२.२०१८ रोजी कळविण्यात आले आहे. तसेच, आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, मुंबई यांच्या दि. १३ जानेवारी २०२० रोजीच्या अर्ध शासकीय पत्रान्वये, राज्यातील ग्रामपंचायतीमध्ये

ग्रामरक्षक दलाची स्थापना होऊन ते कार्यरत होणे गरजेचे वाटत असल्याने दि.२६ जानेवारी २०२० रोजी महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ अंतर्गत प्रत्येक गावात होणाऱ्या ग्रामसभेच्या विषयसुचीमध्ये ग्रामरक्षक दल स्थापनेबाबत विषय समाविष्ट करण्यास तसेच, ग्रामरक्षक दल स्थापनेकरिता आवश्यक ती यथायोग्य कार्यवाही करण्याच्या सुचना सर्व जिल्हाधिका-यांना देण्यात आल्या आहेत.

(३) राज्य उत्पादन शुल्क विभागाने माहे एप्रिल, २०१९ ते मार्च, २०२० या कालावधीत अवैध दारूची निर्मिती/ विक्री/ वाहतुक करणाऱ्यांविरूध्द एकूण ४६६५१ गुन्हे नोंदविले असून रु.११५.१६ कोटी इतक्या रकमेचा मुद्देमाल जप्त केला आहे. अवैध दारु धंद्यावर निर्बंध आणण्याच्या दृष्टीने पोलीस विभाग आणि राज्य उत्पादन शुल्क विभाग हे दोन्ही विभाग स्वतंत्रपणे कारवाई करतात, तसेच, केलेल्या कार्यवाहीची माहिती एकमेकांना देत असतात. तसेच कार्यवाहीसाठी गरजेनुसार संयुक्तरित्या कारवाई करण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या हद्दीत वास्तव्यास असलेल्या जेष्ठ नागरिकांना पुनर्वसन प्रकल्पात समाविष्ट करण्याबाबत

**(२८) ३७२३ (०२-०४-२०२०). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालाड (पूर्व) येथील संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या वन विभागाच्या हद्दीत वास्तव्य करीत असलेल्या, वैजनाथ बाबू साबरे यांचेसह सहा ज्येष्ठ नागरिकांनी, मुख्य वन संरक्षण व संचालक संजय गांधी राष्ट्रीय उद्यान बोरीवली यांना, पुनर्वसनाच्या यादीमध्ये त्यांच्या नावाचा समावेश करण्याची मागणी दिनांक २० डिसेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास दिलेल्या लेखी निवेदनाद्वारे केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू निवेदनाच्या अनुषंगाने उक्त सहा ज्येष्ठ नागरिकांची नावे पुनर्वसनाच्या यादीमध्ये समाविष्ट करण्याच्या दृष्टीने, शासनातर्फे कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय राठोड (१४-०७-२०२०) :**(१) दिनांक २३.१२.२०१९ चे लेखी निवेदनाद्वारे मागणी केली आहे.

(२) व (३) पुनर्वसनाचा दावा करणा-या उक्त सहा नागरिकांनी मा.उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार रक्कम रु. ७०००/- वन विभागाकडे जमा केली आहे. सदर सहा व्यक्तींच्या कागदपत्रांच्या स्कॅनिंगची कार्यवाही पूर्ण करण्यात आली असून पात्रता निश्चितीअंती सदनिकांच्या उपलब्धतेनुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

---

**सहकारी बँकेने दैनंदिन अहवाल रिझर्व बँकेला पाठविणेसंदर्भात**

**(२९) ३७४३ (०३-०४-२०२०). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात पंजाब एण्ड महाराष्ट्र सहकारी बँकेतील गैरव्यवहार निदर्शनास आल्यानंतर भारतीय रिझर्व बँकेने सहकारी बँकेचा दैनंदिन अहवाल सध्याच्या ईमेलवर आधारीत पद्धती ऐवजी इंटरनेटवर आधारीत पद्धतीनुसार पाठविण्याचे आदेश सहकारी बँकांना दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात एकूण किती सहकारी बँका कार्यरत आहेत, भारतीय रिझर्व बँकेच्या आदेशानुसार एकूण किती सहकारी बँकानी आपला दैनंदिन अहवाल ईमेलवर आधारीत पद्धती ऐवजी इंटरनेटवर आधारीत पद्धतीनुसार पाठविण्याबाबत कार्यवाही केली आहे,

(३) असल्यास, अद्याप सहकारी बँकांनी इंटरनेटवर आधारीत पद्धतीनुसार दैनंदिन अहवाल रिझर्व बँकेला सादर केला नसल्यास त्याची कारणे काय आहेत

(४) तसेच दैनंदिन अहवाल रिझर्व बँकेला पाठविणेसंदर्भात सहकारी बँकांना निर्देश देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (२३-०७-२०२०) :** (१) नाही.

(२) राज्यात एकूण ४९६ सहकारी बँका कार्यरत आहेत. त्यापैकी कोणत्याही बँकेने इंटरनेटवर आधारीत दैनंदिन अहवाल रिझर्व बँकेला सादर केलेला नाही.

तथापि, रिझर्व बँकेने दिनांक २७.१२.२०१९ रोजीच्या परिपत्रकान्वये रु.५ कोटी व त्यापेक्षा जास्त कर्ज रक्कम असलेल्या सर्व कर्जदारांची माहिती सादर करण्याचे निर्देश राज्यातील सर्व नागरी सहकारी बँकांना दिले आहेत.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक जिल्हयातील संजय गांधी निराधार योजनेतील प्रलंबित प्रकरणांबाबत**

**(३०) ३७६८ (०३-०४-२०२०). श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), श्रीमती सीमा महेश हिरे (सीमाताई) (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्हयातील संजय गांधी निराधार योजनेतील बहुतांशी प्रकरणे तहसीलदार नाशिक यांच्याकडे प्रलंबित असल्याची बाब दिनांक २२ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी सेवा योजनेच्या माध्यमातून ऑनलाईन अर्ज केलेला असताना व त्यासाठी आवश्यक शासकीय शुल्क भरलेले असतानाही अर्ज प्राप्त होत नसल्याची बाब त्याच दरम्यान निदर्शनास आलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने दिव्यांग, निराधार, विधवा, परित्यक्ता, वृद्ध यांना संजय गांधी निराधार योजनेच्या लाभापासून वंचित ठेवण्यास जबाबदार असणाऱ्या अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे (१८-०८-२०२०) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) होय.
(३), (४) व (५) सेतू/ ई-महासेवा केंद्राव्दारे उशिरा अर्ज प्राप्त झाल्यामुळे अर्ज प्रलंबित राहिले आहेत. त्यामुळे संबंधित सेतू चालकावर जिल्हाधिकारी, यांच्याकडे कारवाई करण्यासंदर्भात संबंधित तहसिलदार यांनी प्रस्ताव सादर केला आहे.

---

**टेंभुर्णी (ता.भोकरदन-जाफ्राबाद, जि.जालना) ग्रामपंचायत कार्यालयाअंतर्गत स्वच्छतागृहाच्या अनुदानास पात्र लाभार्थ्यांचे अनुदान प्रलंबित असल्याबाबत**

**(३१) ३९७७ (०७-०४-२०२०). श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) टेंभुर्णी (ता.भोकरदन-जाफ्राबाद, जि.जालना) ग्रामपंचायत कार्यालयाअंतर्गत स्वच्छतागृहाच्या अनुदानास ८७२ लाभार्थी पात्र असून त्यांना प्रती लाभार्थी १२ हजार रुपये प्रोत्साहन अनुदान दिले जाणार असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यापैकी ४७२ लाभार्थ्यांचे फोटो देण्यात आले असून ३९४ लाभार्थ्यांचे विहित नमुन्यातील प्रस्ताव माहे मार्च, २०१९ मध्ये गटविकास अधिकारी कार्यालयात ऑनलाईन करण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरील प्रस्ताव सादर होऊन ९ महिन्यांचा कालावधी होऊनही अद्याप या लाभार्थ्यांचे खात्यावर रक्कम जमा झाली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार लाभार्थ्यांचे प्रलंबित अनुदान देण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (२८-०८-२०२०) :** (१) व (२) टेंभुर्णी (ता.भोकरदन-जाफ्राबाद, जि.जालना) ग्रामपंचायत अतंर्गत पायाभूत सर्वेक्षणातून सुटलेली लाभार्थ्यांची संख्या ८७२ आहे. त्यापैकी ११६ लाभार्थींना मयत, दुबार, कायम स्थलांतरीत अशा विविध कारणामुळे पात्र यादीतून वगळण्यात आले आहे. उर्वरित ७५६ लाभार्थ्यांपैकी ६७९ कुटुंबांनी बांधकाम पूर्ण केलेले आहे व ४७२ लाभार्थ्यांचे फोटो अपलोड केले आहेत. पात्र ३८७ लाभार्थ्यांचे माहे मार्च-२०१९ मध्ये गट विकास अधिकारी, जाफ्राबाद यांचेकडे प्राप्त झालेले प्रस्ताव अपूर्ण असल्याने ते परत करण्यात आले. त्यानंतर नोव्हेंबर, २०१९ मध्ये ०४ प्रस्ताव, डिसेंबर, २०१९ मध्ये २४२ प्रस्ताव, जानेवारी,२०२० मध्ये ७८ प्रस्ताव, फेब्रुवारी, २०२० मध्ये ९८ प्रस्ताव व मार्च,२०२० मध्ये २५७ प्रस्ताव असे एकूण ६७९ परिपूर्ण प्रस्ताव प्राप्त झाले.

उपरोक्तनुसार स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) अंतर्गत अनुदानासाठी ऑक्टोबर,२०१९ पर्यंत एकही परिपूर्ण प्रस्ताव प्राप्त झाला नाही.

(३) व (४) उपरोक्तनुसार पात्र ७५६ लाभार्थ्यांपैकी ६७९ लाभार्थ्यांचे परिपूर्ण प्रस्ताव नोव्हेंबर,२०१९ते मार्च,२०२० पर्यंत प्राप्त झाले. त्यास अनुसरुन ६७९ लाभार्थ्यांना स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) अंतर्गत प्रत्येकी रुपये १२,०००/-याप्रमाणे एकूण रुपये८१,४८,०००/-अदा करण्यात आले आहे. उर्वरित ७७ कुटुंबांचे परिपूर्ण प्रस्ताव अद्याप अप्राप्त आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## श्री.स्वामिनाथन आयोगाने ५० टक्के नफा देण्याच्या शिफारशीच्या अनुषंगाने शेतकरी वर्गाला कर्जमाफीचा लाभ देण्याबाबत

**(३२) ४०३६ (०३-०४-२०२०). श्री.राम सातपुते (माळशिरस) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गत सरकारच्या काळात खाजगी सावकारांकडील १७० कोटींचे कर्ज माफ करण्याची घोषणा केली असून, काही निकषांमुळे व किचकट ऑनलाईन प्रक्रीयेमुळे मोठ्या प्रमाणात शेतकरी वर्गाला लाभ मिळालेला नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, श्री.स्वामिनाथन यांच्या नेतृत्वाखालील आयोगाने ५० टक्के नफा देण्याची शिफारस शासनाला केली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त शिफारशीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (२३-०७-२०२०) :** (१) विदर्भ व मराठवाड्यातील शेतकऱ्यांनी परवानाधारक सावकारांकडून घेतलेल्या कर्जास माफी देण्याचा निर्णय दिनांक १०.०४.२०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला असून त्यानुसार राज्यातील ४२,६८७ शेतकऱ्यांनी १३७३ परवानाधारक सावकारांकडून घेतलेल्या रु.६२.८७ कोटींच्या कर्जास माफी देण्यात आलेली आहे.

(२) नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे जिल्ह्यातील ग्रामीण भागातील शेतकरी व नागरिकांवर होणाऱ्या बिबट्याच्या हल्ल्यापासून संरक्षण मिळण्याबाबत**

**(३३) ४५१२ (०९-०४-२०२०). श्री.राहूल कुल (दौंड), श्री.अशोक पवार (शिरुर), श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.सुनिल शेळके (मावळ), श्री.निलेश लंके (पारनेर), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील दौंड, आंबेगाव, जुन्नर, खेड, शिरूर या तालुक्यामध्ये बिबट्या व अन्य वन्य प्राण्यांचा उपद्रव मोठ्या प्रमाणात वाढल्याची बाब माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दौंड तालुक्यातील मौजे यवत, कासुर्डी, पारगाव, पिंपळगाव, वाळकी, वाखारी, वरवंड, कुसेगाव, खामगाव, कानगाव, नानगाव इ. परिसरात बिबटयाचा वावर मोठया प्रमाणात वाढला आहे हेही खरे हे हि खरे आहे काय
(३) असल्यास, दौंड तालुक्यातील पाटस या ठिकाणी ३० नोव्हेंबर २०१९ वा त्यासुमारास बिबट्याचा वाहनाच्या धडकेने मृत्यू झाला आहे हेही खरे आहे काय
(४) असल्यास, नागरिकांनी वेळो वेळी मागणी करून देखील वन विभागाकडून पिंजरा लावला जात नसून मोठ्या प्रमाणावर पशुधनाचे देखील नुकसान झाले आहे हेही खरे आहे काय
(५) असल्यास, उक्त बिबट्यांचा प्रतिबंध करण्याबाबत वन विभागाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय राठोड (१४-०७-२०२०) :** (१) व (२) पुणे वनवृत्तामध्ये पूणे व सोलापूर या दोन जिल्ह्यांचा समावेश आहे. पुणे वनवृत्तमध्ये बिबट, चिंकारा, ससा, रानडुक्कर, मोर, कोल्हा, लांडगा व तरस या वन्यप्राण्यांचा अधिवास आहे. त्यामुळे मानव-वन्यप्राणी संघर्षची शक्यता नाकारता येत नाही.
(३) पूणे-सोलापूर महामार्गावारील पाटस येथे अज्ञात वाहनाच्या धडकेने दिनांक २८.११.२०१९ रोजी मध्यरात्री १२.०० ते १२.१० वाजताच्या सुमारास एक बिबट (मादी) मृत्यु झाल्याची घटना निदर्शनास आली आहे.
(४) बिबट हा अनुसूचि-१ मधील प्राणी आहे. त्यामुळे बिबट्याच्या हल्ल्याची घटना व त्याचे गांभीर्य लक्षात घेवून वन्यजीव (संरक्षण) अधिनियम, १९७२ मधील तरतूदींचे नुसार बिबट्याला जेरबंद करण्याची कार्यवाही करण्यात येते.
(५) मानव-वन्यप्राणी संघर्ष टाळण्याच्या अनुषंगाने क्षेत्रिय स्तरावर खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येतात.

• वन कर्मचाऱ्यांचे पथक तयार करुन नियमित पणे संरक्षित क्षेत्र व बिबट प्रवण क्षेत्रात गस्त घालण्यात येते.

• वन्यप्राण्यांना वनक्षेत्रातच पीण्याचे पाणी उपलब्ध व्हावे म्हणून कृत्रिम पाणस्थळे, वनतळी, चेकडॅमची निर्मिती करण्यात येते.

• संयुक्त वनव्यवस्थापन समित्यांचे मार्फत नागरीकांना मानव-वन्यप्राणी-संघर्षच्या परिस्थितीत खबरदारी घेणेबाबत सभेचे अयोजन करुन स्थानिकांचे प्रबोधन करण्यात येते. तसेच सूचना फलक / भित्तीपत्रकाद्वारे माहिती देण्यात येते.

• बिबट वन्यप्राणी मानवी वस्तीमध्ये आढळून आल्यास तात्काळ त्यास जेरबंद करुन त्यास नैसर्गिक अधिवासत मुक्त करण्यात येते.

• वन्यप्राण्यांनी नुकसान केल्यास प्रचलित शासन निर्णयातील तरतूदीनुसार संबंधितांना नुकसान भरपाईची रक्कम अदा करण्यात येते.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सामाजिक न्याय विभागामार्फत विविध योजनांना देण्यात येणारे अनुदान तसेच उत्पन्न दाखल्याची मर्यादा वाढविणेबाबत**

**(३४) ४५५८ (०३-०४-२०२०). श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनामार्फत पुरविल्या जाणाऱ्या संजय गांधी निराधार योजना, श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्ती वेतन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय वृद्धापकाळ निवृत्ती योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्ती वेतन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय अपंग निवृत्ती योजना इ. योजने मार्फत दरमहा केवळ १००० रुपये अनुदान देण्यात येत असून हे तुटपुंजे अनुदान वाढविणे तसेच, यासाठी आवश्यक असलेल्या कागदपत्रामध्ये २१,०००/- रु. पेक्षा कमी उत्पन्नाचा दाखला काढणे आवश्यक असून शहरी भागामध्ये गरजूंना सदरचा दाखला मिळणे शक्य होत नाही यामुळे उत्पन्न दाखल्याची मर्यादा वाढविणेबाबत वारंवार शासनाकडे मागणी केली आहे, हे खरे आहे काय ,

(२) असल्यास, संजय गांधी व श्रावणबाळ योजनेतील लाभार्थी निवडीमध्ये उत्पनाची अट २१ हजार वरुन ५० हजार करण्याबाबत तत्कालीन सामाजिक न्यायमंत्री महोदयांनी सभागृहास आश्वासीत केले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शासनामार्फत विविध योजनेतून देण्यात येणारे अनुदान वाढविणे तसेच उत्पन्न दाखल्याची मर्यादा वाढविणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे (१८-०८-२०२०) :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) दिनांक २० ऑगस्ट, २०१९ च्या शासन निर्णायान्वये लाभार्थ्यांच्या अर्थसहाय्यात दरमहा रु. ६००/- वरुन रुपये १०००/- तर १ अपत्य असलेल्या विधवा लाभार्थ्यांना रु. ११००/- व २ अपत्य असलेल्या

विधवा लाभार्थ्यांना रु. १२००/- इतकी अर्थसहाय्यात वाढ करण्यात आली आहे. तसेच सदरहु योजनेतील दिव्यांग लाभार्थ्यांसाठी वार्षिक उत्पन्न मर्यादा रु. ५००००/- करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**आर्वी, आष्टी व कारंजा (जि.वर्धा) तालुक्यात अतिवृष्टीने बाधित शेतकऱ्यांना नुकसान भरपाई पासून वंचित ठेवल्याबाबत**

**(३५) ४५८४ (१४-०४-२०२०). श्री.दादाराव केचे (आर्वी) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वर्धा जिल्हयातील आर्वी-आष्टी-कारंजा तालुक्यात माहे सप्टेंबर-ऑक्टोबर, २०१९ मध्ये अतिवृष्टी होवून शासकीय अधिकाऱ्यांनी चुकीचा अहवाल सादर केल्यामुळे शेतकरी मदतीपासून वंचीत राहीले असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आर्वी तालुक्यात ६७२.६ हेक्टर, आष्टी तालुक्यात ४०१.१४ हेक्टर, कारंजा तालुक्यात ३१०.२७ हेक्टर इतकी नुकसानीची शासकीय आकडेवारी आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विजय वडेट्टीवार (१०-०८-२०२०) :** (१) हे खरे नाही.
(२) होय,
(३) माहे जुलै ते ऑगस्ट मधील अतिवृष्टीमुळे शेतीपिकाच्या झालेल्या नुकसानीकरिता आर्थिक मदत देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.
तसेच, माहे ऑक्टोबर-नोव्हेंबर, २०१९ मध्ये अवकाळी पाऊसामुळे शेती/फळपिकांच्या झालेल्या नुकसानीकरिता रू.१५०.९७ लक्ष एवढया निधीचे वाटप करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**हिंगोली जिल्हयातील एक गाव एक ग्राम विद्युत व्यवस्थापक योजनेबाबत**

**(३६) ४६३४ (१०-०४-२०२०). श्री.तान्हाजी मुटकुळे (हिंगोली) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्हयातील ग्रामीण भागात विद्युत सुविधा तातडीने उपलब्ध करुन देण्यासाठी एक गाव एक ग्राम विद्युत व्यवस्थापक ही योजना पात्र उमेदवार मिळत नसल्याने अनेक दिवसापासून व्यवस्थापक उमेदवारांच्या नियुक्ता प्रलंबित असल्याची बाब माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ग्रामीण भागात विद्युत वितरण कंपनीला विद्युत सुविधा देण्यात अनेक अडचणी येत आहेत, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, यामुळे शेतक-यांना व नागरिकांना असंख्य अडचणींना सामोरे जावे लागत असून शासनाकडून याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. नितिन राऊत (१९-०८-२०२०) :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) हे खरे नाही. सद्यस्थितीत ग्रामीण भागात विद्युत वितरण कंपनीकडे विद्युत सुविधा देण्यासाठी तंत्रज्ञ, वरिष्ठ तंत्रज्ञ, प्रधान तंत्रज्ञ हे कर्मचारी उपलब्ध आहेत. तसेच ज्या भागात पदे रिक्त आहेत अशा ठिकाणी बाह्यस्त्रोत कर्मचाऱ्यांच्या नियुक्त्या करण्यात आल्या आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सेनगाव तालुक्यातील (जि.हिंगोली) सुकळी (खु.) शेत शिवारात रानडुकरांनी शेतीचे केलेले नुकसान**

**(३७) ४६३७ (०२-०४-२०२०). श्री.तान्हाजी मुटकुळे (हिंगोली) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हिंगोलीतील सेनगाव तालुक्यातील सुकळी (खु.) शेत शिवारात रानडुकारांनी शेतक-यांच्या शेतातील कपाशीचे फार मोठया प्रमाणात नुकसान केले असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय
(२) असल्यास, कपाशीचे काही पीक परतीच्या पावसाने तसेच काही पीक रानडुकराच्या मुक्त संचाराने नष्ट झाले असल्याचे आढळून आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, या परिसरातील रानडुकारांचा उपद्रव थांबवण्यासाठी वन विभागाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय राठोड (१४-०७-२०२०) :** (१) हे खरे नाही.
(२) तालुका कृषि अधिकारी सेनगांव यांचे कडुन प्राप्त दिनांक १८.०२.२०२० च्या पत्रानुसार सेनगांव तालुक्यात कापसाचे परतीच्या पावसामुळे ३३% पेक्षा कमी नुकसान झाले असल्याचे निदर्शनास आले आहे.

(३) रानडुक्करांचा उपद्रव थांबविण्याच्या दृष्टीने खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येतात.

• रानडुक्कर प्रवण क्षेत्रात फटाके फोडुन, आवज करुन त्यांना वनक्षेत्रात/ जंगलात हुसकाविण्यात येते.

• पिण्याच्या पाण्याच्या शोधात रानडुक्कर जंगला बाहेर पडू नये म्हणून त्यांना वनक्षेत्रात कृत्रिम पाणवठ्यांची व्यवस्था करण्यात येते.

• रानडुक्करांनी शेतपिकांचे नुकसान केल्यास प्रचलित शासन निर्णयातील तरतुदीनुसार तत्काळ आर्थिक सहाय्य देण्यात येते.

• शेतपिकांसाठी हानीकारक असणाऱ्या रोही व रानडुक्कराना पारध करण्याची परवानगी देण्यात येते.

• स्थानिक ग्रामस्थांना वन अधिकारी / कर्मचारी तसेच संयुक्त वन व्यवस्थापन समित्यांच्या बैठकीमधून मार्गशन करण्यात येते.

• वन्यजीवांबद्दल जनतेत जनजागृती निर्माण करण्यात येते.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**धुळे जिल्ह्यातील लाभार्थ्यांना संजय गांधी निराधार योजनेअंतर्गत अनुदान मिळणेबाबत**

**(३८) ४६४७ (०३-०४-२०२०). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे जिल्ह्यातील संजय गांधी निराधार योजनेअंतर्गत गरीब, गरजू लाभार्थ्यांना मिळणारे अनुदान मागील ४ महिन्यांपासून मिळाले नसल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी अनुदानासाठी वृध्द महिलांनी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या आवारात निदर्शने केली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करुन लाभार्थ्यांना योजनांचे अनुदान तातडीने देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे (१८-०८-२०२०) :** (१) धुळे जिल्ह्यात संजय गांधी निराधार योजनेअंतर्गत ९२५२५ इतके लाभार्थी असून त्यापैकी राष्ट्रीयकृत बँकेत खाते असणाऱ्या ९१९२१ लाभार्थ्यांना अर्थसहाय्य वितरीत करण्यात आले आहे. उर्वरीत लाभार्थ्यांनी कागदपत्रांची पुर्तता न केल्याने त्यांना अर्थसहाय्याचे वितरण करण्यात आले नाही. कागदपत्रांच्या पुर्ततेनंतर त्यांना अर्थसहाय्याचे वितरण करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### औसा (जि.लातूर) अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानाची भरपाई मिळण्याबाबत

**(३९) ४७८८ (१४-०४-२०२०). श्री.अभिमन्यु पवार (औसा) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औसा विधानसभा मतदार संघातील (जि.लातूर) येथील १६ हजार शेतकऱ्यांना अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानीचे राज्य शासनाने मंजूर केलेले अनुदान अद्याप शेतकऱ्यांना मिळाले नसून तसेच प्राप्त अनुदानही राष्ट्रीयकृत बँकेकडून देण्यास विलंब केला जात असल्याचे माहे जानेवारी २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आलेले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विभागीय आयुक्त कार्यालय,औरंगाबाद येथे लातूर जिल्हा आढावा बैठकीत मा.मुख्यमंत्री महोदयांनी उक्त प्रकरणी नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळाली नसल्याबाबत विभागीय आयुक्त औरंगाबाद यांनी तातडीने कार्यवाही करण्याबाबत दिनांक १० जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निर्देश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर अनुदान वाटपास झालेल्या विलंबाबाबत तसेच विभागीय आयुक्त औरंगाबाद यांना निदेश देवुनही अद्यापही अप्राप्त शेतकऱ्यांना अनुदान मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण काय आहेत ?

**श्री. विजय वडेट्टीवार (१०-०८-२०२०) :** (१) हे खरे नाही.

तथापि, लातूर जिल्हयाकरिता माहे फेब्रुवारी, २०२० पर्यंत तीन टप्प्यात रू.३७१०३.५४ लक्ष इतका निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. तद्नंतर माहे, जून, २०२० मध्ये रू.२४४९.२६ लक्ष इतका निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. असा एकूण लातूर जिल्हयाकरिता ३९५५२.८० लक्ष एवढा निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. त्यापैकी औसा तालुक्यासाठी एकूण ६५२०.०० लक्ष इतका निधी वाटप करण्यात आला आहे.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### ग्रामपंचायत म्हारळ (ता.कल्याण) यांना सार्वजनिक कामासाठी सर्वे नंबर ३८ गटविभाग हि जागा मिळण्याबाबत

**(४०) ५०८४ (१५-०४-२०२०). श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण तालुक्यातील म्हारळ ग्रामपंचायत याना सार्वजनिक कामासाठी शासकीय जागा उपलब्ध नसल्यामुळे म्हारळ येथील सर्वे नंबर ३८ गटविभाग हि जागा सार्वजनिक कामासाठी उपलब्ध करून द्यावी अशी मागणी लोकप्रतिनिधी यांनी ठाणे जिल्हा नियोजन बैठकीत व मा.उप मुख्यमंत्री यांच्याकडे ठाणे जिल्हा आराखडा बैठीकीमध्ये दिनांक २० व २४ जानेवारी २०२० रोजी वा त्यासुमारास निवेदनाव्दारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निवेदनामध्ये क्रीडांगण, घनकचरा व्यवस्थापन, पाण्याची टाकी, गार्डन, शाळा, अंगणवाडी अश्या महत्वपूर्ण कामांची मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरचा प्रस्ताव दिनांक १३ ऑगस्ट, २०१८ रोजी वन परिक्षेत्र अधिकारी कल्याण यांच्याकडे प्रलंबीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, लोकप्रतिनिधींनी केलेल्या मागणी वर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय राठोड (१८-०८-२०२०) :** (१) कल्याण तालुक्यात मौजे म्हारळ येथील सर्वे नंबर ३८ गटविभाग हि जागा सार्वजनिक कामासाठी उपलब्ध करून द्यावी अशी मागणी लोकप्रतिनीधींनी ठाणे जिल्हा नियोजन बैठकीत दिनांक २४ जानेवारी, २०२० रोजी मौखिकरित्या केली आहे.

(२) लोकप्रतिनिधींनी क्रीडांगण, घनकचरा व्यवस्थापन, पाण्याची टाकी, गार्डन, शाळा, अंगणवाडी अशा महत्वपुर्ण कामांची मौखिक मागणी केली आहे.

(३) ग्रामपंचायत म्हारळ यांच्याकडून उप विभागीय अधिकारी, कल्याण यांना दिनांक १४.८.२०१८ रोजी प्रस्ताव सादर करण्यात आला असून तो प्रत्यक्षात वन परिक्षेत्र अधिकारी, कल्याण यांना दिनांक २६.११.२०१८ रोजी प्राप्त झालेला होता.

(४) ग्रामपंचायत, म्हारळ यांनी सदर वन जमीन मागणी प्रस्तावामध्ये केवळ सार्वजनिक शौचालय, क्रिडांगण, व घनकरचा व्यवस्थापन या सुविधांकरीता वन जमीन मागणी केली आहे. सदर तरतूद सामूहिक सुविधांकरीता देण्याचे अनुसूचित जाती व इतर पारंपारिक वन निवासी (वन हक्क मान्यता) अधिनियम, २००६ मधील कलम ३(२) मध्ये नाही. प्रस्तावानुषंगाने त्रुटींची पुर्तता करण्याबाबत वन परिक्षेत्र अधिकारी, कल्याण यांनी संबंधित ग्रामपंचायतीस कळविले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**केदारखेडा (ता.भोकरदन, जि.जालना) येथील शेतकऱ्यांच्या शेतातील सोयाबीन गंजीला लागलेली आग**

**(४१) ५३५१ (०९-०४-२०२०). श्री.नारायण कुचे (बदनापूर) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सुदाम जाधव, केदारखेडा (ता.भोकरदन, जि.जालना) येथील शेतक-याच्या शेतातील सोयाबिन गंजीला आग लागून भस्मसात झाले असून सदर शेतक-यास नुकसान भरपाई मिळावी याकरीता स्थानिक लोकप्रतिनिधी (बदनापूर-अंबड) यांनी कृषी मंत्री यांना दिनांक २८ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निवेदन देऊन मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीवर शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,

(३) त्यानुसार शेतकऱ्यास नुकसान भरपाई देण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विजय वडेट्टीवार (१०-०८-२०२०) :** (१) होय, हे खरे आहे
(२) सदर घटनेकरिता आर्थिक मदत देण्याबाबत शासन निर्णय, दि.१३.०५.२०१५ मध्ये कोणतीही तरतूद नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे जिल्ह्यातील रुपी को.ऑ.बँक लि. पुणे या बँकेत झालेला गैरव्यवहार

**(४२) ५६०९ (०३-०४-२०२०). श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे जिल्ह्यातील रुपी को.ऑ.बँक लि. पुणे या बँकेत मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाला असून ठेवीदारांच्या ठेवी धोक्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने ठेवीदारांच्या ठेवी त्यांना परत मिळवून देण्याबाबत तसेच बँकेच्या संचालक मंडळावर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (३१-०७-२०२०) :** (१) होय.
(२) रुपी बँकेवर रिझर्व्ह बँकेने दि. २१/०२/२०१३ पासून निर्बंध लादले आहेत. रिझर्व्ह बँकेच्या सूचनेनुसार रुपी बँकेवर प्रशासक मंडळाची नियुक्ती करण्यात आली आहे.

बँकेच्या ठेवीदारांना ठेवी वाटप करण्याच्या अनुषंगाने हार्डशीप योजनेंतर्गत एकूण ७४,१२२ ठेवीदारांना रु.२९४.४९ कोटी रक्कम अदा करण्यात आली आहे. तसेच बँकेने नोव्हेंबर, २०१९ अखेर एकूण रु.३००.६३ कोटींची कर्जवसूली केलेली आहे.

बँकेतील गैरव्यवहारांच्या अनुषंगाने सहकार आयुक्तांनी दिनांक ०२.०२.२०१६ रोजीच्या आदेशान्वये महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ८८ अन्वये प्राधिकृत अधिकाऱ्याची नियुक्ती केली असून प्राधिकृत अधिकाऱ्यांनी रुपी को-ऑप. बँकेचे संचालक व अधिकारी/कर्मचारी अशा एकूण ८७ व्यक्तींवर सुमारे रु.१,४९० कोटी रकमेची जबाबदारी निश्चित केली आहे.

सहकार आयुक्तांच्या सदर आदेशाविरुध्द संबंधित ४८ संचालक व अधिकारी/कर्मचारी यांनी तत्कालीन मा.मंत्री (सहकार) यांचेकडे अपील दाखल केले होते. त्या अनुषंगाने तत्कालीन मा.मंत्री (सहकार) यांनी दि.०२.०२.२०१६ रोजीच्या आदेशास दि.२७.१२.२०१६ व दि.०४.०१.२०१७ रोजीच्या आदेशान्वये स्थगिती दिली आहे. सद्यस्थितीत या प्रकरणी अपर मुख्य सचिव (पाणीपुरवठा व स्वच्छता) यांचेसमोर सुनावणी चालू आहे.

रुपी बँकेच्या संदर्भात कायम स्वरुपी तोडगा निघावा यासाठी सहकार आयुक्तांनी रुपी बँकेचे महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेत विलिनीकरणाचा प्रस्ताव रिझर्व्ह बँकेला दि. १६.०१.२०२० च्या पत्रान्वये सादर केला आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सातपुर (जि.नाशिक) येथील कामगार नगर नागरिक वसाहतीतील देशी व विदेशी दारुचे दुकान स्थलांतरीत करण्याबाबत**

**(४३) ५६५० (०३-०४-२०२०). श्रीमती सीमा महेश हिरे (सीमाताई) (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सातपुर (जि.नाशिक) येथील कामगार नगर नागरिक वसाहतीत गिव्ह ॲण्ड टेक नावाने सुरु होत असलेल्या देशी व विदेश दारु दुकानास तीव्र विरोध होत असतांना देखील दुकान सुरु केले असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर ठिकाणी महानगरपालिकेची शाळा तसेच एक खाजगी शाळा असून देखील देशी व विदेशी दारुचे दुकान सुरु करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी देशी व विदेशी दुकान इतरत्र स्थलांतरीत करण्याकरीता अप्पर जिल्हाधिकारी यांच्याकडे लेखी निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन देशी व विदेशी दारुचे दुकान स्थलांतरीत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील (१७-०८-२०२०) :** (१) व (२) हे खरे नाही.
सदर ठिकाणी अद्यापी मद्यविक्री दुकान सुरु नाही. परंतू सदर ठिकाणी अनुज्ञप्ती स्थलांतरणाबाबतचा अर्ज प्राप्त असून त्यावर कार्यावाही सुरु आहे.
(३) व (४) सदर मद्यविक्री अनुज्ञप्तीबाबत स्थानिक नागरिकांकडून तक्रारी प्राप्त आहेत त्यावर कार्यवाही करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील लबाना समाजाला ओ बी सी मध्ये सामाविष्ट करण्याबाबत**

**(४४) ५७२४ (१०-०४-२०२०). श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर) :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण विभाग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर, ठाणे तसेच महाराष्ट्रात इतर ठिकाणी लबाना समाज मोठ्या प्रमाणे राहत आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य सरकारच्या विविध योजना आणि फायदे यापासुन वंचित रहात असल्याने लबाना समाजाला ओ.बी.सी मध्ये सामाविष्ट करावे अशी मागणी लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री तथा मा.मंत्री सामाजिक न्याय मंत्री याना दिनांक २९ जुलै, २०१९ रोजी वा त्यासुमारास निवेदन द्वारा केली आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महाराष्ट्रातील विमुक्त जाती या प्रवर्गामध्ये ७ या क्रमांकावर लबान असे लिहिलेलं असून या बरोबर लबाना असेही समाविष्ट करण्याची मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, लबाना समाजाला ओबीसी मध्ये समाविष्ट करण्याची मागणी अनेक वर्षपासून करीत असून या मागणीकडे राज्य शासन दुर्लक्ष करीत असल्यामुळे या समाजामध्ये नाराजीचे वातावरण निर्माण होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, लबाना समाजाला ओबीसी समाजामध्ये समाविष्ट करण्याच्या दृष्टिने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची करणे कोणती ?

**श्री. विजय वडेट्टीवार (२४-०७-२०२०) :** (१), (२), (३), (४), (५) व (६) राज्यातील लबाना समाजाला ओबीसी प्रवर्गामध्ये आरक्षण देण्यात यावे याबाबतचे दिनांक २९.०७.२०१९ चे निवेदन शासनास प्राप्त झाले आहे. सदर निवेदनाचे अनुषंगाने महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोगाकडून दि.०७ नोव्हेंबर,२०१९ ला अहवाल मागविण्यात आला असुन आयोगाचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्यानुषंगाने योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

---

## देऊळगावराजा तालुक्यातील (जि.बुलढाणा) येथील महावितरण उपकेंद्रावर एक ऑपरेटर असल्याने होत असलेली गैरसोय

**(४५) ५७८२ (०२-०४-२०२०). श्री.संजय गायकवाड (बुलढाणा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देऊळगावराजा तालुक्यातील (जि.बुलढाणा) येथील महावितरण उपकेंद्रावर एक ऑपरेटर असल्याने कृषि पंपाना ऐन रब्बी हंगामात कमी दाबाने वीज पुरवठा होत असल्याची बाब माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे हे खरे आहे काय,

(२) तसेच डीगस फिडरची कृषिपंपाची व्हीसीबी कित्येक दिवसांपासून नादुरुस्त आहे हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत संबधित अधिका-यांकडे तक्रार करुनही कोणतीच कार्यवाही करण्यात आली नाही हेही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. नितिन राऊत (१९-०८-२०२०) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे आहे.
(३) हे खरे नाही. तथापि ११ के.व्ही दिग्रस कृषी वाहिनीची व्हीसीबी देखभाल व दुरुस्तीनंतरही वारंवार नादुरुस्त होत असल्याकारणाने सदर वाहिनीचा वीजभार हा लगतच्या ११ के.व्ही टाकरखेड कृषी वाहिनीवर जोडण्यात आलेला आहे. सद्यस्थितीत या दोन्ही वाहिनीवरील कृषी पंपांना चक्राकार पध्दतीने प्रत्येक फिडरला आठवडयातील तीन दिवस ८ तास व ४ दिवस रात्री १० तास याप्रमाणे योग्य दराने वीज पुरवठा करण्यात येत आहे.
(४) ३३/११ के.व्ही. देऊळगांवराजा मही उपकेंद्रातील ११ के.व्ही.दिग्रस फिडरची नादुरुस्त व्हिसीबी बदलविण्याकरिता कंत्राटदारांची नेमणूक करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे खानू (ता.वेल्हे, जि.पुणे) येथे विद्युतीकरण करणेबाबत.**

**(४६) ५९९४ (०२-०४-२०२०). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे खानू (ता.वेल्हे, जि.पुणे) येथील डोंगरी, दुर्गम व जंगलात बसलेल्या गांवात विद्युतीकरण करणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी तत्कालीन मा.उर्जामंत्री यांना दिनांक २१ ऑक्टोबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास लेखी पत्र सादर केले आहे, हे खरे आहे काय
(२) असल्यास,या पत्रावर शासनाने निर्णय घेऊन व निधीची तरतूद करुन सदरील गावाचे विद्युतीकरण करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. नितिन राऊत (१९-०८-२०२०) :** (१) हे खरे आहे.
(२) मौजे खानू (ता.वेल्हे, जि.पुणे) या गावातील १७ घरकुलांना महाऊर्जामार्फत सौर ऊर्जेद्वारे वीज पुरवठा करण्यात आला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईतील डबघाईस गेलेल्या द सिटी को-ऑपरेटीव्ह बँकेत गुंतवणुक केलेल्या खातेदारांच्या रक्कमेबाबत**

**(४७) ६१२३ (०३-०४-२०२०). श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर), श्री.योगेश सागर (चारकोप), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील डबघाईस गेलेल्या द सिटी को-ऑपरेटीव्ह बँकेत सुमारे ९१ हजार खातेदार असून त्यांची करोडो रुपयांची रक्कम बँकेत अडकून असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वात्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुंबईत १० शाखा असलेली सदरहू बँक डबघाईस गेल्यामुळे दिनांक १८ एप्रिल, २०१८ रोजीपासून रिझर्व्ह बँकेने निर्बंध घातले असून अद्याप ते कायम आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर बँकेच्या डबघाईमुळे ११ खातेदार मृत्यूमुखी पडल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदरहू बँकेचे राज्य सहकारी बँकेत विलिनिकरण करून खातेदारांना न्याय मिळवून देण्याबाबत, गुंतवणूक खातेदारांना त्यांची रक्कम परत करण्याबाबत तसेच संबंधित बँकेच्या संचालक मंडळाने गैरव्यवहार केल्याबाबत त्यांचेवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (३१-०७-२०२०) :** (१) व (२) होय.
(३) व (४) सदर बँकेमधील गैरव्यवहाराच्या तक्रारीच्या अनुषंगाने बँकेचे सन २०१० ते २०१५ या कालावधीचे चाचणी लेखापरिक्षण करण्यात आले आहे. सदर अहवालानुसार ५९ कर्ज प्रकरणात रु. ९८.८० कोटी रकमेचा गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आले असून सदर अहवाल आर्थिक गुन्हे शाखेत पाठविण्यात आलेला आहे. त्यानुषंगाने आर्थिक गुन्हे शाखेमार्फत पुढील कार्यवाही चालू आहे.

उपरोक्त चाचणी लेखापरिक्षण अहवालातील शिफारसीनुसार बँकेस झालेल्या आर्थिक नुकसानीची जबाबदारी संबंधितांवर निश्चित करण्यासाठी सहकार आयुक्तांनी दि.२१.०५.२०१९ रोजीच्या आदेशान्वये महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ८८ अन्वये प्राधिकृत अधिकाऱ्याची नियुक्ती केली आहे.

बँकेच्या ठेवीदारांना ठेवींचे वाटप करण्याच्या अनुषंगाने हार्डशीप योजनेंतर्गत मार्च, २०२० पर्यंत १८,६८७ ठेवीदारांना रु. ७८.८२ कोटी अदा करण्यात आलेले आहेत.

बँकेचे अध्यक्ष व ठेवीदारांनी केलेल्या विनंतीनुसार सिटी को. ऑप. बँकेचे राज्य सहकारी बँकेत विलीनीकरणाचा प्रस्ताव सहकार आयुक्तांनी दि. १६.०१.२०२० रोजीच्या पत्रान्वये रिझर्व्ह बँकेला सादर केला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अहमदनगर जिल्ह्यामध्ये ऊस बागायत क्षेत्र असलेल्या भागांमध्ये बिबट्याचा वाढलेला उपद्रव

**(४८) ६३५० (०९-०४-२०२०). श्री.लहू कानडे (श्रीरामपूर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे पिंपळगाव फुनगि तालुका राहुरी (जिल्हा अहमदनगर) या प्रवरा नदी काठाच्या गावांमध्ये जाधव वस्तीतील तीन वर्षाच्या मुलीवर बिबट्याने हल्ला केल्याची घटना दिनांक २० फेब्रुवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास घडल्याचे उघडकीस आले आहे, हे खरे आहे काय,
(२) अहमदनगर जिल्ह्यामध्ये ऊस बागायत क्षेत्र असलेल्या भागांमध्ये बिबट्या वाघांची संख्या वाढली असून त्यांचा मानवी वस्तीवर देखील वावर वाढला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यापूर्वीही श्रीरामपूर तालुक्यातील कुरणपूर येथील १९ वर्षीय युवक व मौजे गळनिंब येथील बालिकेचा बिबट्याच्या हल्ल्यामध्ये मृत्यू झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, वन विभागात याची वारंवार माहिती दिली असून शेतामध्ये अनेक ठिकाणी बिबट्या मादिने अनेक पिल्लांना जन्म दिल्याची बाब ग्रामस्थांनी लक्षात आणून देवूनही वन विभागाने वन्यप्राणी संरक्षणाच्या नावाखाली कोणतीही कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, बिबट्यांचा बंदोबस्त करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच बिबट्यापासून वारंवार होणारे हल्ले रोखण्यासाठी वनविभागाकडून कोणती उपायोजना करण्यात आली वा येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय राठोड (१४-०७-२०२०)** : (१) मौजे पिंपळगाव फुनगिं तालुका राहूरी या प्रवरा नदी काठाच्या गावामधील जाधव वस्तीवर दिनांक ०३.०२.२०२० रोजी कु.श्रेया मंजाबापू जाधव या मुलीवर बिबट्याने हल्ला करुन जखमी केले आहे.
(२) हे खरे आहे.
(३) श्रीरामपूर तालुक्यातील मौजे कुरणपुर येथे दिनांक ०४.०९.२०१९ रोजी चि. दर्शन चंद्रकांत देठे वय वर्ष १० यास बिबट्याने हल्ला करुन जखमी केले. उपचाराकरीता प्रवरा मेडीकल कॉलेज मध्ये दाखल केले तथापि सदर मुलाचा उपचारादरम्यान मृत्यु झाला आहे.

मौजे गळनिंग येथे दिनांक ३१.०१.२०२० रोजी कु. ज्ञानेश्वरी नामदेव मारकड, वय वर्ष ३ हिस बिबट्याने हल्ला करुन जखमी केल्याची घटना घडली उपचाराकरीता प्रवरा मेडीकल कॉलेज, लोणी येथे दाखल केले असता उपचारापुर्वी तीचा मृत्यु झाला आहे.
(४) व (५) मानव वन्यप्राणी संघर्ष टाळण्याच्या दृष्टीने अहमदनगर वन विभागामार्फत खालीलप्रमाणे उपाय योजना करण्यात येतात.

• वन्यजीव (संरक्षण) अधिनियम, १९७२ चे कलम ११ नुसार आवश्यक कार्यवाही करुन बिबट प्रवण क्षेत्रात पिंजर लावण्यात आले असून मौजे उक्कलगाव येथे दिनांक २०.०२.२०२० रोजी २ बछडे, दिनांक २३०२.२०२० रोजी १ बछडा व १ बिबट मादी तर मौजे ममदापूर (चांदेवाडी) येथे दिनांक २२.०२.२०२० रोजी १ बछडा व १ बिबट मादी असे एकूण २ मादी बिबट व ४ बछड्यांना जेर बंद करण्यात आले आहे.
• बिबट्यांचा आढळ, माहिती किंवा तक्रार प्राप्त झाल्यावर सदर क्षेत्रात किंवा परिसरात तात्काळ वन कर्मचारी जावून जनजागृती करुन स्थानिकांना सतर्क केले जाते.
• नागरिकांना बिबट्यापासून सावधगिरीचे ऊपाय समजावून सांगण्यात येतात.

• गावांमध्ये भिंतीपत्रके व जनजागृती फलक लावण्यात येतात.

• बिबट्यांपासून सावधगिरीचे उपाययोजना ध्वनीफीत ध्वनीक्षेपकावर दुचाकी वाहनाद्वारे फिरविले जाते. मानव व वन्यप्राणी संघर्ष टाळण्याच्या दृष्टीने शाळांमध्ये कार्यशाळा घेवून विद्यार्थाचे प्रबोधन करण्यात येते.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**उजनी धरणातील पाणलोट क्षेत्रात मगरींचा वावर वाढला असल्याबाबत**

**(४९) ६८०९ (०५-०४-२०२०). श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उजनी धरणातील पाणलोट क्षेत्रात मगरींचा वावर वाढला असल्याची बाब दि. ९ जानेवारी २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे हे खरे आहे काय

(२) असल्यास, या जलाशयात मोठ्या प्रमाणावर मच्छीमार व्यवसाय करीत असून अनेक शेतकरी देखील या परीसरात शेतीपंपाच्या विद्युत मोटार सुरु करण्यासाठी जात असल्याने त्याच्या जीवितास धोका निर्माण झाला आहे हेही खरे आहे काय

(३) असल्यास, याच परिसरातील एका ओढ्यातील मगरीचा व्हिडीओ देखील सोशल मिडीयावर व्हायरल झाल्यामुळे देखील नागरिकामध्ये मोठ्याप्रमाणावर भीतीचे वातावरण पसरलेले आहे हेही खरे आहे काय

(४) असल्यास, उक्त ठिकाणच्या मगरींचा बंदोबस्त करण्याबाबत वन विभागाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय राठोड (१४-०७-२०२०) :** (१) पूणे वनवृत्तील इंदापुर वनपरिक्षेत्रामध्ये उजनी धरणाचे भिंतीलगतच्या शेतात दिनांक ०१.१२.२०१९ रोजी मगर आढळून आली आहे.

(२) व (३) हे खरे नाही.

या परिसरात मगरीने हल्ला केल्याची किंवा हानी पोहचविल्याची घटना निर्दशनास आलेली नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बपेरा वन विभाग अंतर्गत (जि.भंडारा) बिनाखी गावात**
**वाघाने ३ लोकांना जखमी केल्याबाबत**

**(५०) ७६६८ (०३-०४-२०२०). श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बपेरा वन विभाग अंतर्गत (जि.भंडारा) बिनाखी गावात वाघाने धुमाकुळ घालून ३ गावकऱ्यांना गंभीर जखमी केल्याची बाब दिनांक २५ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वन्य प्राणी व मानवी संघर्ष टाळण्याकरिता शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या आहेत वा करण्यात येत आहेत,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय राठोड (१४-०७-२०२०)** :(१) हे खरे आहे.
(२) मानव व वन्यप्राणी संषर्घ टाळण्याच्या दृष्टीने खालील प्रमाणे उपाययोजना करण्यात येतात.
• भंडारा वन विभागामध्ये जलद बचाव गट (Rapid Rescue Team) ची स्थापना करण्यात आली आहे.
• बचाव गटातील कर्मचाऱ्यांना मानव - वन्यप्राणी संघर्षाची परिस्थिती हाताळण्याच्या दृष्टीने प्रशिक्षण दिले आहे.
• दिनांक २६.०१.२०२० रोजी जलद बचाव पथक, नागपूर, वर्धा व नवेगाव-नागझिरा विशेष व्याघ्र संरक्षण दल तसेच वन कर्मचाऱ्यांच्या समुहानी मौजा बपेरा बिनाकी, सुकाळी या गावातील शेतशिवारात वाघाचा शोध घेतला असता वाघाचे अस्तित्व निदर्शनात आले नाही.
• जलद बचाव पथक, भंडारा व नवेगाव-नागझिरा व्याघ्र प्रकल्पाच्या पथकाने वाघाचा मागोवा घेण्यासाठी विविधी १० ठिकाणी कॅमेरा ट्रॅप लावण्यात आले होते. तथापि वाघाचे अस्तित्व असल्याचे कोणतेही पूरावे आढळून आलेले नाहीत.
• उन्हाळ्यात वन्यप्राण्यांना वनक्षेत्रात पिण्याचे पाणी उपलब्ध व्हावे म्हणून कृत्रिम पाणवठाद्वारे पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात येते.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :** **राजेन्द्र भागवत**
**मुंबई.** **सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.